रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३२३ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## दहावी, बारावीचा निकाल ६ जूनपूर्वी?

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा निकाल कधी लागणार याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. त्यानुसार २५ मेपर्यंत बारावीचा, तर दहावीचा निकाल ६ जूनपूर्वी जाहीर होईल, अशी माहिती बोर्डाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. तसंच, जे विद्यार्थी परीक्षा अनुत्तीर्ण झाले आहेत, त्यांची पुरवणी परीक्षा जुलैमध्ये होणार असल्याचे सांगण्यात आले. हा निकाल mahasscboard.in आणि mahresult.nic.in वर पाहता येणार आहे.

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ३० एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## पेणमध्ये आज आव्हाडांची तोफ धडाडणार

**पेण :** ३२ रायगड लोकसभा निवडणुकीचे इंडिया आघाडीचे लोकसभेचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारची जाहीर सभा मंगळवारी (दि. ३०) रोजी सायंकाळी ६ वाजता महात्मा गांधी वाचनालय मैदान, पेण येथे होणार आहे. या सभेसाठी उमेदवार अनंत गीते स्वतः उपस्थित राहणार आहेत. जितेंद्र आव्हाडांसह शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, काँग्रेसचे महेंद्र घरत, प्रशांत पाटील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या उपस्थितीत सभा पार पडणार आहे. तरी, या सभेसाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




आजचा अग्रलेख
...म्हणे यांनी जगवले

## वेधक

### महायुतीचा रडीचा डाव फसला

**खोपोली :** शिंदे गट महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना या निवडणुकीत आपला पराभव समोर दिसत असल्याने ही लोकसभा निवडणूक लढवताना विरोधी प्रतिस्पर्धी संजोग वाघेरे पाटील यांची मते कशी विभागली जातील, याकरिता शिंदे गट महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे अनेक डावपेच खेळत आहेत. असाच एक डावपेच त्यांनी खेळत महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या नाशिक येथील संजय वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज मावळ मतदारसंघामध्ये दाखल केला होता. मात्र, नामनिर्देशन पत्रांची छाननी करताना काही कागदपत्रांची कमी असल्याने तो अर्ज बाद झाला.

### गळफास घेतलेल्या स्थितीत मृतदेह

**महाड :** रानवडी गावाच्या जंगलभागात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला आहे. हा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत असल्याने या इसमाने आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. संदीप पार्टे यांना झाडाला लटकलेल्या अवस्थेत हा मृतदेह आळून आल्यानंतर त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती दिली. मृतदेह हा वीस ते बावीस दिवसांपूर्वीचा असावा, असा अंदाज असून, तो ओळखण्यापलीकडे आहे. मृताचे वय अंदाजे ५० वर्षे असावे, असे सांगण्यात आले. मृतदेह पूर्णपणे सडलेला आणि सुकलेला पान ५ वर

### विमानतळाला बॉम्बने उडवणार?

**नागपूर :** नागपूर विमानतळ बॉम्बने उडवून देऊ अशा धमकीचा मेल सोमवारी (२९ एप्रिल) विमानतळ प्रशासनाला आला आहे. या धमकीच्या मेलनंतर नागपूर विमानतळ परिसरात पोलिसांचा बंदोबस्त मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला आहे. बॉम्बशोधक व नाशक पथकाच्या माध्यमातून विमानतळावर तपासणी करण्यात आली. परंतु, तपासणीमध्ये नागपूर विमानतळावर कुठलीही संशयास्पद वस्तू किंवा हालचाल दिसून आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.




● (छायाचित्र : समीर मालोदे)

# लोकशाही वाचवण्यासाठी लढा

## गीतेंचे रामराज येथे कार्यकर्त्यांना आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारतात हुकूमशाही चोर पावलाने येत आहे. ही हुकूमशाही ठेचून काढत लोकशाही वाचवण्यासाठी एकदिलाने लढण्याचा निर्धार करा, असे आवाहन रायगड लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांनी सोमवारी (दि. २९) रामराज येथील सभेत कार्यकर्त्यांना केले.



ते पुढे म्हणाले की, चीन देशाबरोबरच रशियामध्ये हुकूमशाहीचे राज्य आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष विरोध पान ५ वर

## ही लढाई हुकूमशाहीविरोधात : चित्रलेखा पाटील



देशातील राजकीय परिस्थिती बिकट असून, वातावरण बदलत आहे. हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असून, खासगीकरणाचा घाट घातला आहे. त्यामुळे या निवडणुकीत ही लढाई हुकूमशाहीविरोधात आहे. गरीब जनता आणि दुष्ट राजा अशी परिस्थिती असणार आहे. त्यामुळे लोकशाही संपून जाईल, अशी भीती शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केली. छत्रपती पान ५ वर

## विश्वासघातकी तटकरेंना जनताच घरी बसवणार

### माजी आ. पंडित पाटील यांचा विश्वास

शेतकरी कामगार पक्षाच्या मदतीने मागील लोकसभा निवडणुकीत तटकरे दिल्लीला गेले. मात्र, ते आता शेकापला संपविण्याची भाषा करीत आहेत. या पाच वर्षांत फक्त घोषणांचा पाऊस पाडून सर्वसामान्य जनतेचा तटकरेंनी विश्वासघात केला. या विश्वासघातकी तटकरेंना सात मे रोजी मतदान करून जनताच घरी बसवतील, असा विश्वास माजी आ. पंडित पाटील यांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ तटकरे यांनी शेकापला हद्दपार करणार असे सांगितले.



त्यांना प्रत्युत्तर देताना पंडित पाटील यांनी तटकरेंवर टीकास्त्र सोडले.

यावेळी पंडित पाटील म्हणाले, देश स्वातंत्र्य झाल्यापासून देशाच्या व राज्याच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्षाची महत्त्वाची भूमिका ठरली आहे. जनतेबरोबरच शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवींशी बांधिलकी ठेवून शेतकरी कामगार पक्षाने काम केले आहे. रायगडसह राज्याच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्षाने ठाम भूमिका ठेवली. त्यामुळे आजही शेतकरी कामगार पक्षाचा राज्याच्या पान ५ वर

## मजगावमध्ये शिंदे गटाला दणका



### असंख्य मुस्लीम कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन मुरूड तालुक्यातील मजगावमधील असंख्य मुस्लीम कार्यकर्त्यांनी रविवारी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या हस्ते या नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या पक्षप्रवेशामुळे शिंदे गटाच्या शिवसेनेला दणका मिळाला आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी आशिष देशपांडे, माजी सभापती चंद्रकांत कमाने, महेश पाटील, संतोष जमनू, नानाशेठ पाटील, शांताराम मानकर, जनाब फिरफिरे आदी शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मजगावमधील असंख्य मुस्लीम समाज शिंदे गटात कार्यकर्ता म्हणून काम करीत होता. मात्र, शिंदे गटाच्या शिवसेनेकडून त्यांना योग्य वागणूक मिळत नव्हती. शिंदे गटाच्या मनमानी कारभाराला ही मंडळी कंटाळली होती. विशेष करून तरुण मंडळींमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. पान ५ वर

# प्रसूतीसाठी पैशांची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात असलेल्या उपजिल्हा रुग्णलयात तालुक्याच्या विविध भागातून रुग्ण उपचार घेण्यासाठी येत असतात. २६ एप्रिल रोजी कर्जत शहरातील गरोदर महिला या बाळंतपणासाठी रुग्णलयात दाखल झाली होती. तिच्याकडून उपजिल्हा रुग्णलयातील डॉक्टरांनी तीन हजार रुपयांची मागणी केली असून, त्याबाबत संबंधित महिलेच्या पतीने चौकशीची मागणी केली आहे.

कर्जत शहरातील सरताज लियाकत अली खान यांनी आपली पत्नी नसरीन लियाकत अली खान यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी रुग्णालयात कर्तव्यावर असलेले डॉ. मोरे यांनी सरताज लियाकत अली खान यांच्याकडे उपचार करण्यासाठी तीन हजार रुपयांची मागणी केली. उपजिल्हा रुग्णालयात सर्व प्रकारचे उपचार, शस्त्रक्रिया इत्यादी सुविधा मोफत दिल्या जात असतानाही डॉ. मोरे यांनी पैशांची मागणी केल्यामुळे लियाकत खान यांनी ही बाब आपले पती सरताज यांच्या कानांवर जाऊन पान ५ वर




- **उपजिल्हा रुग्णालयातील प्रकार उघडकीस**
- **गरोदर महिलेच्या पतीकडून तक्रार**

> भूलतज्ज्ञ आठवड्यातून दोनच वेळा २४-२४ तासांची ड्युटी करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल असतात. इतर वेळी खासगी भूलतज्ज्ञांना बोलवावे लागते. ती हजार रुपये त्यांची फी द्यावी लागेल, असे मी रुग्णाच्या नातेवाईक पतीस सांगितले. बाळंतपणासाठी भूल देणे आवश्यक बाब असल्याने त्या डॉक्टरांना देण्यासाठी खर्च येईल असे सांगितले, अन्य कोणत्याही उपचारासाठी पैशांची मागणी केली नाही.
>
> – डॉ. मोरे, उपजिल्हा रुग्णालय, कर्जत

## नात्याला काळीमा!

### काकानेच केला पुतणीवर अत्याचार

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोलीत राहणाऱ्या एका काकाने आपल्या अल्पवयीन पुतणीला शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. त्याने पीडित तरुणीचे आठ वर्षांपूर्वी काढलेले अश्लील व आक्षेपार्ह व्हिडीओ, फोटो तिच्या पतीला पाठवून तिची बदनामी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकणातील पीडित तरुणी व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा तिचा चुलत काका हे दोघेही कळंबोलीत राहण्यास आहेत. २०१६मध्ये पीडित तरुणी अल्पवयीन असताना काकाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. त्यावेळी काकाने पीडित तरुणीचे नग्नावस्थेतील फोटो व व्हिडीओदेखील काढले होते. दरम्यान, पीडित तरुणीचे लग्न झाल्यानंतर पान ५ वर

# जिल्ह्यात महायुतीमध्ये असमन्वय

**। थळ । विशेष प्रतिनिधी ।**

- **भाजप निरीक्षक मनधरणीसाठी अलिबागेत**



इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांचा तडाखेबाज प्रचार सुरु आहे. मात्र, विरोधी गटातील नेते आणि पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय नाही. त्यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी, त्यांना कामाला लागा, असे सांगण्याची वेळ भाजपाचे निरीक्षक प्रवीण दरेकर यांच्यावर आली. या खास मोहिमेसाठी ते सोमवारी (दि. २९) अलिबाग-थळ येथे आले होते.

निवडणुका जाहीर झाल्यानंतर उद्धव ठाकरे, शरद पवार, आमदार जयंत पाटील, नाना पटोले यांनी समन्वय साधत अनंत गीते यांची उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर गीते हे आपल्या घटक पक्षातील सर्व सहकाऱ्यांसह कामाला लागले आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये त्यांनी रायगड लोकसभा मतदारसंघ अक्षरशः पिंजून काढला आहे.

गीतेंच्या प्रचारासाठी घटक पक्षातील योग्य अशी यंत्रणा कामाला लागली आहे. जाहीर सभा, प्रचार रॅली, कॉर्नर सभा, गाव बैठका, घरभेटीतून थेट मतदारांशी संपर्क साधण्यात येत आहे. त्याला मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गीतेंची लोकप्रियता वाढत असल्याने विरोधी उमेदवार सुनील तटकरे यांच्या महायुतीचे टेन्शन वाढले आहे.

महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) शिंदे गट, मनसे, भाजपा या घटक पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यामध्ये अद्यापही म्हणावा तसा सुसंवाद दिसून येत नाही. भाजापासाठी तटकरे निवडून येणे फार आवश्यक आहे. यासाठी आज स्वतः भाजपाचे निरीक्षक हे अलिबाग-थळ येथे आले होते. त्यांनी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिंदे गट, मनसे या प्रमुख नेत्यांसह पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते यांच्या मनोमिलनासाठी बैठक घेतली. महायुतीमध्ये मनोमिलन घडवण्यासाठी बड्या नेत्याला यावे लागते. यावरुनच महायुतीमध्ये धुसफूस असल्याचे बोलले जाते.

सर्वांनी समन्वय साधावा, आपापसातील मतभेद विसरुन कामाला लागा, अशा सूचना जाहीरपणे दरेकर यांनी केल्या. त्याला आता महायुतीमधील घटक पक्ष किती प्रमाणात प्रतिसाद देतील, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## अखेर आरसीएफ प्रशासन नरमले

### शाळेचे नवीन प्रवेश सुरू करण्याचे आदेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेली आरसीएफ शाळा बंद होणार अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. परंतु, विद्यार्थी व पालकांची आक्रमक भूमिका आणि जि.प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशामुळे आरसीएफ प्रशासनाला नमते घ्यावे लागले असून, नवीन शैक्षणिक वर्षाचे प्रवेश सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आरसीएफ शाळेच्या संदर्भात मागील महिन्यापासून चालू पान ५ वर






# दूषित पाण्यामुळे चित्रलेखा पाटील आक्रमक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

- **४० हून अधिक गावांना शुद्ध पाणी द्या**
- **मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मागणी**

उमटे येथील धरणाचे गाळ काढण्यास जिल्हा परिषद उदासीन ठरत आहे. त्यामुळे ४० हून अधिक गावांना दूषित पाणी पिण्याची वेळ आली आहे. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पिण्याच्या पाण्यासाठी आक्रमक भूमिका घेत मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांची भेट घेतली. नागरिकांना शुद्ध पाणी द्या, गाळ काढा, अशी मागणी केली. त्यांच्या मागणीला दुजोरा देत गाळ काढण्याबरोबरच मुबलक व शुद्ध पाणी देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन बास्टेवाड यांनी दिले.



● (छायाचित्र : अमोल नाईक)

यावेळी जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, उपअभियंता निहाल चवरकर, टेंबुलकर, अलिबाग तालुका पुरोगामी युवक अध्यक्ष विक्रांत वार्डे, अंजली ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते नितीन पालकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

उमटे धरणातून ६० हजार नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. धरणातील गाळ काढण्याचा गाजावाजा महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे आणि शिंदे गटाचे आमदार दळवी यांनी दोन वर्षांपूर्वी केला होता. मात्र, गाळ काढण्यात ते अपयशी ठरले. सत्ताधाऱ्यांच्या अपयशामुळे उमटे धरणात गाळ अधिक व पाणी कमी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तीन-तीन, चार-चार दिवस पाण्याची प्रतीक्षा करुन नशिबी गढूळ पाणी मिळत आहे. या गढूळ पाण्यामुळे जलजन्य आजार होण्याची भीती अधिक आहे. ही बाब चित्रलेखा पाटील यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्टेवाड यांच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी त्यांनी दूषित पाण्याबरोबरच धरणातील गाळाच्या प्रश्नाला दुजोरा देत सामाजिक बांधिलकीतून गाळ काढण्यासाठी पत्रव्यवहार केला जाईल, धरणात पाण्याचा साठा पान ५ वर




## वे|ध|क

### उत्तर मध्य मुंबईत तिरंगी लढत

**मुंबई :** राज्याचे माजी पोलीस महासंचालक संजय पांडे उत्तर-मध्य लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. ते अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात उतरणार आहेत. स्थानिक नागरिकांनी काही दिवसांपूर्वी माझी भेट घेऊन लोकसभेसाठी निवडणूक लढवावी अशी इच्छा व्यक्त केली होती. केवळ पक्षाच्या जोरावर ही निवडणूक लढवली जात आहे. त्याला पर्याय देण्यासाठी, स्थानिक उमेदवार म्हणून मी रिंगणात उतरणार आहे. माझ्या उमेदवारीबाबत गेल्या काही दिवसांपासून पर्याय पडताळून पाहत होतो, असे पांडे यांनी सांगितले.

### फेरमतदान सुरू

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोमवारी सकाळी ७ वाजता कर्नाटकातील चामराजनगर जिल्ह्यातील हनुर तालुक्यातील इंदिगनाथा गावात लोकसभा निवडणुकीसाठी फ ेरमतदानाला सुरुवात झाली. २६ एप्रिल रोजी येथे झालेल्या मतदानावेळी दोन गटामध्ये झालेल्या हाणामारीमुळे येथे मोठा गोंधळ झाला होता. त्यावेळी ईव्हीएम आणि फर्निचरचे नुकसान झाल्याने येथे मतदान थांबविण्यात आले होते.तथापि, अधिकाऱ्यांनी नागरिकांना पटवून दिले आणि २६ एप्रिल रोजी सुमारे नऊ जणांनी मतदान केले, त्यानंतर गावकऱ्यांच्या एका गटाने मतदान केंद्रावर दगडफेक केली. या झटापटीत काही ग्रामस्थही जखमी झाले. तसेच ईव्हीएमचेही नुकसान झाले. हाणामारीची घटना पाहता निवडणूक आयोगाने या भागात पुन्हा मतदान घेण्याचे आदेश दिले होते. जिल्हा प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, पायाभूत सुविधांच्या विकासाअभावी गावकऱ्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीनंतर येथे मतदान घेण्यात आले.

### महायुतीत जागांचा तिढा कायम!

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांचं मतदान झालं आहे तर महाराष्ट्रात आणखी तीन टप्प्यांचं मतदान शिल्लक आहे, पण महायुतीमधल्या काही जागांचा तिढा अद्यापही कायम आहे, त्यातच आता मुंबईतले शिवसेनेचे दोन्ही उमेदवार निश्चित झाल्याची माहिती दिली आहे. शिवसेनेकडून दक्षिण मुंबई मतदारसंघातून भायखळा विधानसभा मतदारसंघाच्या आ. यामिनी जाधव यांना उमेदवारी मिळणार आहे, तर उत्तर-पश्चिममुंबईमतदारसंघातून जोगेश्वरी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना आ. रविंद्र वायकर यांना उमेदवारी मिळणार असल्याचं सांगितलं आहे. महायुतीमधील ठाणे, पालघर आणि नाशिक लोकसभा मतदारसंघातला तिढा अजूनही कायम आहे.

# मोदींनी पंतप्रधानपदाची किंमत ठेवली नाही



**। पुणे । प्रतिनिधी ।**

सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ सासवडमधील पालखी मैदानावर जाहीर सभा झाली. शरद पवार, संजय राऊत, बाळासाहेब थोरात, अमोल कोल्हे आणि सुप्रिया सुळे यांच्यासह महाविकास आघाडीतील नेत्यांच्या उपस्थितीत सभा पार पडली. सासवडमधील पालखी मैदानावर ही सभा झाली. महाविकास आघाडीतील सर्व पक्षाच्या वतीने सभेचं आयोजन करण्यात आलं होते. या सभेला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी संबोधित केलं. यावेळी बोलताना त्यांनी नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. भाजपच्या ध्येय धोरणांवर शरद पवार यांनी टीका केली.

नरेंद्र मोदी पुण्यात पुणेकरांना माझा नमस्कार अशी भाषणाला सुरुवात करतील. दिल्लीत सांगतात की शरद पवार यांनी शेतकऱ्यांना मदत केली. बारामतीत येऊन म्हणतात बोट धरून आलो, असं सांगतात आणि ८ महिन्यात निवडणुकीमध्ये वेगळं भाषण करतात. भाषणात सातत्य असलं पाहिजे. नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची किंमत ठेवली नाही, असं शरद पवार म्हणाले.

पुरंदरमधील लोकांनी नेहमी साथ देतात. मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवतात, त्याबाबत चिंता आहे. पंचायत, जिल्हा परिषद, नगर परिषद निवडणूक झाल्या का? लोकसभा आणि विधानसभा या निवडणुक न घेण्याची दुर्बुद्धी या सरकारला सुचू शकते. ४०० पार करण्याचा अर्थ असा आहे त्यांना वाटेल ते त्यांना करायचा आहे. त्यांना संविधान बदलायचं आहे म्हणून त्यांना ४०० जागा पाहिजे आहेत. मोदींची धोरण काय आहेत यातून कळते, त्यामुळे अधिक या निवडणुकीत लक्ष देण्याची गरज आहे, असं म्हणत पवारांनी भाजपवर टीका केली आहे.

### 'मोदी लोकशाही उध्वस्त करणार'

**नरेंद्र मोदी हे हुकूमशाहीच्या रस्त्याने निघाले आहेत. लोकशाही उध्वस्त करणार आहेत. हुकूमशाही करणाऱ्याला खड्या सारखे बाजूला काढू. नुसती तुतारी नाही तुतारी वाजवणारा माणूस आपली खून आहे. देश योग्य दिशेला नेण्याची जबाबदारी आमची आहे, असं म्हणत शरद पवार यांनी स्थानिकांना संबोधित केलं.बांगलादेश सारखा देश आपल्यापेक्षा पुढे आहे. अशोक चव्हाण यंच्यावर आरोप केलं ते भाजपसोबत गेले. भोपाळमध्ये भाषण केले बँक आणि इरिगेशन मध्ये घोटाळा केला असता आरोप केला. ज्यांच्यावर आरोप केले ते आज कुठं आहेत? झारखंड आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री यांना जेलमध्ये टाकलं, असं शरद पवारांनी म्हटलं.**

# शरद पवार यांच्या सभांना गर्दी- भुजबळ

**। नाशिक । प्रतिनिधी ।**



अनेक जण हे राष्ट्रवादी शरद पवार गटातून अजित पवार गटात आले आहेत. त्यामुळे अनेकांच्या मनात शरद पवार यांच्याविषयी सहानुभूती असल्याने त्यांच्या सभेला गर्दी होत आहे, असे मत छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. मत देण्याची वेळ येते तेव्हा, मतदार सहानुभूती विसरतो. देशाचे नेतृत्व कोण करू शकेल, अशा व्यक्तीला मतदान केले जाते, अशी पुष्टीही त्यांनी जोडली.

नाशिकमध्ये कोणाला घाबरुन नव्हे तर, आपल्यामुळे महायुतीचा उमेदवार ठरवण्यात अडचण येऊ नये, यासाठी माघार घेतली. किमान २० मेपर्यंत तरी उमेदवार जाहीर करावा, असा खोचक टोला भुजबळ यांनी महायुतीच्या नेत्यांना हाणला. कुठल्याही समाजाचा, पक्षाचा उमेदवार असला तरी त्याला किती मते द्यायची हे लोक ठरवतील. अनेक ठिकाणी ओबीसी उमेदवार उभे आहेत. माझ्या उमेदवारी माघारीवरून काहींच्या मनात राग असला तरी, महायुती अडचणीत येईल अशी कृती करू नका, असा सल्ला त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. नाशिकमध्ये जो उमेदवार दिला जाईल, त्याला विजयी करु, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# 'मोदींचा रुबाब शिवसेनेमुळे'

## राणेंच्या बालेकिल्ल्यात ठाकरेंचा घणाघात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**



लोकसभा निवडणुकीत रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात विनायक राऊत यांचा प्रचार करण्यासाठी उद्धव ठाकरे आले होते. या सभेत बोलताना उद्धव यांनी राणे आणि पंतप्रधान मोदी यांच्यावर घणाघाती टीका केली. कोकण हे शिवसेनेचे वैभव आहे, एक तर शिवसेना फोडली, शिवसेना चोरली, चिन्ह चोरलं. चोरलं तर चोरलं आणि कोकणातून धन्युष्यबाण गायब केला. दिल्लीतले दोन गद्दार शिवसेनेबरोबरचं कोकणचं नातं तोडायला निघाले, अशी टीका उद्धव यांनी केली.

मोदींना अजून सूर मिळत नाही आहे. आयपीएल मॅच सुरू झाल्यात, कोणता प्लेअर कुठे गेला हे त्यांना अजून समजत नाही. २०१९ साली मोदींचा रुबाब होता, कारण शिवसेना त्यांच्यासोबत होती. शिवसेना सोबत होती तेव्हा मोदी आणि शाह यांना किती वेळा महाराष्ट्रात यावं लागलं? तुम्हाला अवदसा का आठवली माहिती नाही,फ असं उद्धव ठाकरे म्हणाले.

हे मंत्री लघु सूक्ष्म, एक तरी सूक्ष्म प्रकल्प रत्नागिरीला आणला का? विनायक राऊत, वैभव नाईक उभे राहिले नसते तर कोकणात गुंडाराज झाला असता. इथे जोर जबरदस्तीने कारभार उभारले जात आहेत. त्यांचं मत असं आहे, त्यांचं सरकार आल्यानंतर बारसू काय कोणत्याही प्रकल्पावरून कोणालाही मारू. भाजपला माझा प्रश्न आहे, विनाशाचा प्रचार का करताय? त्यांचं मत म्हणजे विनाशाला मत. महाराष्ट्रावर यांचा आकस टोकावर पोहोचला आहे, असं वक्तव्य उद्धव ठाकरेंनी केलं.

उद्या ईडी सीबीआय आमच्या ताब्यात असणार आहे. आमचं सरकार तुमच्या नांग्या ठेचल्याशिवाय राहणार नाही. बाळासाहेब ठाकरे तुमच्या पाठीशी उभे राहिले नसते, तर अटलजींनी तुम्हाला टाकलं असतं. ४०० पारचा नारा शांत झाला, त्यांचं काही चालत नाही.

२०१४ साली म्हणाले होते प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये देणार होते, आले का? सुप्रीम कोर्टाला धन्यवाद देतो, तुम्ही योग्यवेळी यांची हंडी फोडली, अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

जिथे जातात तिथे राम राम करतात, एक गाणं आहे, आम्ही जातो आमच्या गावा आमचा राम राम घ्यावा, तसं आता राम राम करत आहेत. ही थापाड्यांची टोळी नाही, तर ही दरोडेखोरांची फौज आहे. मी यांच्यासारखं वेडंवाकडं बोलत नाही, जे मी बोलते ते करून दाखवतो. यांची गॅरंटी म्हणजे एक अकेला सबसे भारी, आजूबाजूला भ्रष्टाचारी, ज्याचा सर्वात मोठा घोटाळा त्याला मोठं मंत्रिपद, असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला.

# देशात भाजपाविरोधी लाट

## ■ महायुती अडचणीत : बाळासाहेब थोरात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



देशात आता परिस्थिती बदलली आहे. भाजपा विरोधी लाट आहे. जनतेचा रोष देशभरात आहे. महायुती अडचणीत आहे. उमेदवारीचा निर्णयच ते घेऊ शकत नाहीत.

महाराष्ट्रात ४० च्या आसपास महाविकास आघाडी जाऊन पोहोचेल, असा मोठा दावा काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केला. पंतप्रधान मोदी दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. बेरोजगारी, महागाई, लोकांच्या समस्या यांवर बोलत नाहीत. या देशाचे दुर्देव असे आहे की, पंतप्रधान धर्मावर बोलतात, त्यांना वाटत धर्मावर बोलले की मते मिळतील. पंतप्रधान देशाचे आहेत.

आतापर्यंत काय काम केले पुढे काय करू यावर बोलले पाहिजे. धार्मिक मुद्द्यावर ते बोलतात, मुस्लिम विरोधात बोलले कि हिंदू गठीत होतील असे त्यांना वाटते, भाजपच्या ध्येय धोरणांवर यांनी थोरात यांनी टिका केली. तसेच महाविकास आघाडीच्या विजयाचा विश्वासही व्यक्त केला. जनता पूर्णपणे भाजपावर तसेच पंतप्रधान मोदींवर नाराज आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे', असे ते म्हणाले.

# महायुतीत अजूनही रुसवेफुगवे सुरूच

**। धुळे । प्रतिनिधी ।**

धुळे लोकसभा मतदारसंघातील मालेगाव मध्य, मालेगाव बाह्य व बागलाण हे तीन विधानसभा मतदारसंघ निर्णायक ठरणारे असतात. महायुतीचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे व महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांनी आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला आहे. मात्र, युतीच्या पदाधिकाऱ्यांत अजूनही मोठ्या प्रमाणात रुसवेफुगवे आहेत.

डॉ. भामरे यांच्या प्रचारात शिंदे गट पूर्ण ताकदीनिशी सक्रिय झालेली नाही. धुळे लोकसभेची जागा महायुतीत भाजपच्या वाट्याला गेली. खा. भामरे यांना पक्षाने पुन्हा उमेदवारी दिल्याने इच्छुकांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. जवळपास महिनाभर हे नाराजीनाट्य सुरू होते.

डॉ. भामरे यांनी इच्छुकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आहे. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मेळावे झाले. या मेळाव्यात उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या एका नेत्याच्या समर्थकांनी दांडी मारली. भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला असला, तरी शिंदे गट अद्याप पूर्णपणे सक्रिय झालेली नाही.

# भाजपचा सात खासदारांना ब्रेक

## मुंडे, महाजनांसह मुंबईतल्या तिघांचा समावेश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून प्रचार शिगेला पोहोचला आहे. महाराष्ट्रात महायुतीच्या जागांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. महायुतीच्या ज्या जागांवर उमेदवार जाहीर झालेले नाहीत तिथे भाजपचे खासदार नाहीत. राज्यात २०१९ च्या निवडणुकीत भाजपचे २३ खासदार निवडून आले होते. त्यापैकी ७ खासदारांना यावेळी भाजपने तिकीट नाकारलं असून नव्या चेहऱ्यांना संधी दिली.

भाजपने उत्तर मध्य मुंबईत ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांना उमेदवारी जाहीर केली. शनिवारी भाजपकडून जारी करण्यात आलेल्या यादीत उज्ज्वल निकम यांच्या नावाची घोषणा झाली. याठिकाणी पूनम महाजन या विद्यमान खासदार आहेत. मात्र त्यांना डावलून उज्ज्वल निकम यांना उमेदवारी दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

उत्तर मुंबईत गोपाळ शेट्टी यांना भाजपने यावेळी उमेदवारी दिली नाही. त्यांच्या जागी केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांना संधी दिली आहे. तर उत्तर पूर्व मुंबईमधून गेल्यावेळी मनोज कोटक यांनी निवडणूक जिंकली होती. मात्र त्यांच्याजागी यावेळी मिहिर कोटेचा यांना भाजपने तिकीट दिलं. भाजपने मुंबईतील तीनही विद्यमान खासदारांचे तिकीट कापले.

मुंबईशिवाय, सोलापूर, बीड, अकोला आणि जळगावमध्येही भाजपने विद्यमान खासदारांना तिकीट नाकारत इतर उमेदवारांना संधी दिली. यात बीडमधून प्रीतम मुंडे यांच्याऐवजी पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली. तर अकोल्यात संजय धोत्रे यांच्या जागी पुत्र अनुप धोत्रे यांना संधी मिळाली आहे. सोलापूरमध्ये माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदेंचा पराभव करणाऱ्या जयसिद्धेश्वर स्वामी यांचे तिकिट कापून त्यांच्याजागी राम सातपुते यांना उमेदवारी दिली आहे.

# उन्हाच्या काहिलीत प्रचाराचा धुरळा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूक आता तिसऱ्या टप्प्यात आलेली असताना प्रचार शिगेला पोचला आहे. एप्रिल मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात होणाऱ्या सभांसाठी मातब्बर नेते फिरताहेत. आहाराबाबत सजगता बाळगत नेते प्रचारसभा घेत आहेत. योग्य आहार, भरपूर पाणी पिणे आणि जमेल तेवढी झोप घेणे याची सांगड घालत नेत्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार हे एकेका दिवशी किमान चार सभा, मेळावे पत्रपरिषदा घेत आहेत. त्या त्या गावी मुक्काम करून सभेनंतर महत्त्वाच्या मंडळींच्या भेटीगाठी घेत आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दिवस पहाटे पाच वाजता सुरू होतो. सकाळी सात वाजता संपर्क दौरा सुरु होतो. बारामतीतून वर्धा, अकोला अशा जागी सभा घेऊन परत येतात. या नेत्यांच्या दिमतीला विमाने, वाहने हजर आहेत. मध्यंतरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना अतिश्रम आणि उन्हामुळे चक्कर आली. मात्र त्यांनी काही वेळातच भाषण देऊन प्रचारातील उत्साह दाखवून दिला. चाळीसच्या आसपास तापमान असल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनाही काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जात आहेत.

# महाविकास आघाडीचा ३० ते ३५ जागांवर विजयाचा दावा

**। पुणे । प्रतिनिधी ।**

बारामतीची लढाई ही अस्मितेची लढाई आहे. अर्थात आमच्यासाठी सर्व ४८ जागा महत्त्वाच्या आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीला ३० ते ३५ जागांवर विजय मिळेल, असा दावा शिवसेनेचे संजय राऊत यांनी केला.

पुण्यातील उंड्री येथे रविवारी (दि.२८) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शहराध्यक्ष संजय मोरे, माजी आ. महादेव बाबर आदी या वेळी उपस्थित होते. महायुतीला महाराष्ट्रात जिंकण्याची खात्री असेल तर देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार धमक्या का देत आहेत? बारामती, शिरूर म तदारसंघात लोकांना मताधिक्य न दिल्यास बघून घेईन, अशा धमक्या अजित पवार यांच्याकडून दिल्या जात असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

व्यापारी, उद्योजकांना नोटीस पाठवून दंड आकारण्याची धमकी दिली जात आहे. आर्थिक हितसंबंध असलेले काहीजण धमक्यांना भीक घालतील पण जनता जुमानणार नाही. अनेक वर्षे आपण मंत्री आहात, ही भाषा तुम्हाला शोभते का? बारामतीमध्ये तळ ठोका, तंबू ठोका. काही होणार नाही.

चार जूनला सरकार बदलले दिसेल, अशी टीका त्यांनी अजित पवार यांच्यावर केली. सध्या महायुतीकडून ज्या पद्धतीने राजकारण केले जात आहे, ते महाराष्ट्राला पटलेले नाही. नरेंद्र मोदीयांनीकोल्हापूरमध्येशिवसेनेच्या ठाकरे गटाबाबत वक्तव्य केले होते. याबाबत राऊत म्हणाले, मोदी यांना गांभीर्याने घेवू नका. देशात २०१४ मध्ये मोदी यांच्याबाबत जी लोकभावना आणि प्रेम होते. ते सध्या राहुल गांधी यांच्याबाबत पाहायला मिळत आहे. राहुल गांधी यांना देशभरात चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# देशाला हुकूमशाहीकडे नेण्याची वाटचाल

**। अहमदनगर । प्रतिनिधी ।**

शरद पवार यांनी पुन्हा एकदा केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. ते अहमदनगरमध्ये बोलत होते. काळ्या आईशी इमान राखणारं हे सरकार नाही, ही निवडणूक देशाची आहे. या निवडणुकीत भूमिका घेतली पाहिजे. सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातली, मात्र गुजरातमध्ये शेतकऱ्यांना निर्यात करण्यास परवानगी मग महाराष्ट्र का नाही? असा सवाल करतानाच देशाला हुकूम शाहीकडे नेण्याची वाटचाल सुरू असल्याची टीका पवार यांनी केली आहे. ही निवडणूक देशाची आहे या निवडणुकीत भूमिका घेतली पाहिजे. सरकारने कांदा निर्यातीवर बंदी घातली, मात्र गुजरातमध्ये शेतकऱ्यांना निर्यात करण्यास परवानगी मग महाराष्ट्र का नाही? असा सवाल यावेळी शरद पवार यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की,



काळा पैसा आला नाही, सर्वसामान्य माणसाच्या खात्यात पैसे आले नाही. सतेचा गैरवापर होत आहे, विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार आहे, मात्र ज्यांनी टीका केली त्यांना जेलमध्ये टाकल्याचं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# आरोप-प्रत्यारोपात 'विकासा'ची हरवली चर्चा

**। शिरूर । प्रतिनिधी ।**



शिरूर मतदारसंघात अर्जाची छानती पूर्ण होऊन आता लढतीचे चित्र पूर्ण स्पष्ट झालेले आहे. राज्याच्या राजकारणातील बदलाचे वारे शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या राजकारणावरही परिणाम करणारे ठरले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जास्तीचे आमदार असलेल्या या मतदारसंघात मुख्यमंत्री शिंदे यांचे माजी खा. शिवाजीराव आढळराव पाटील यंदा राष्ट्रवादी काँग्रेसमधून रिंगणात आहेत, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचे विद्यमान खा. अमोल कोल्हे यांनी प्रचाराला निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच सुरुवात केली होती.

निवडणुकाआणिउमेदवारजाहीर होण्यापूर्वीच अजित पवार यांनी थेट अमोल कोल्हे यांना आव्हान देऊन या निवडणुकीत रंगत आणली होती, त्यातून कोल्हे यांच्या प्रचाराला जोर मिळाला. उमेदवार जाहीर झाल्यानंतर एकमेकांवरचा आरोपात आणि श्रेय वादात शिरूरच्या विकासाचे स्थानिक मुद्दे काहीसे मागे पडल्याचे चित्र सध्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वाधिक आमदार असलेला शिरूर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर विद्यमान खासदार आणि आमदारांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले होते. त्यापैकी विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी शरद पवार यांच्यासोबत राहणे पसंत केले, तर आमदारांपैकी शिरूरचे आमदार अशोक पवार वगळता इतर आमदारांनी अजित पवार यांची साथ देणे पसंत केले.

तरीसुद्धा अजित पवार यांनी स्वपक्षातील शिलेदारांऐवजी आढळराव पाटील यांना लोकसभा उमेदवारीची संधी दिली.

जनसंपर्कावर हुकूमत असलेल्या आढळराव पाटील यांच्या बाजूने डॉ. कोल्हे यांच्या कमी जनसंपर्काचा मुद्दा प्रभावीपणे प्रचारात आणला जात आहे.त्याला संसदेतील शेतकऱ्यांसाठी, बैलगाडा शर्यतीसाठी भाषणे आणि कामगिरी याचा दाखला देत कोल्हे यांच्या बाजूने प्रत्युत्तर दिले जात आहे. २५ लाखांहून अधिक मतदार असलेल्या या मतदारसंघात जातीय समीकरणांचे गणित प्रभावी ठरल्याचे गेल्या निवडणुकीत सिद्ध झाले आहे.

# मतदान केंद्रांवर मिळणार आरोग्य सेवा

## वाढत्या तापमानामुळे मतदारांसाठी सुविधा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीसाठी दोन टप्प्यातील मतदान झाले असून उन्हाच्या तडाख्यामुळे अनेक ठिकाणी मतदान कमी झाल्याचे दिसून येत आहे. वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी मतदारानांही त्रास झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता मतदारांसाठी विशेष काळजी घेण्यात येणार असून मतदान केंद्रांवर आपला दवाखानाची आरोग्य सुविधा पुरवण्यात येणार आहे.




निवडणुकीसाठी दोन टप्प्यातील मतदान झाले असून उन्हाच्या वाढत्या तडाख्यामुळे अनेक ठिकाणी मतदान कमी झाल्याचे दिसून येत आहे. वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी मतदारानांही त्रास झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता मतदारांटी काळजी घेण्यात येणार असून मतदान केंद्रांवर आपला दवाखानाची आरोग्य सुविधा पुरवण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर येणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, तसेच कोणालाही त्रास झाल्यास लगेच उपचार मिळावेत यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

### वाढत्या तापमानाचा मतदानावर परिणाम

**लोकसभा निवडणुकीच्या दोन टप्प्यातील मतदान देशात आणि महाराष्ट्रातील काही भागात झाले. मात्र, वाढत्या तापमानाचा राज्यात मतदानाव परिणाम झाल्याचे दिसून आले. त्यामुळे अनेक ठिकाणी मतदाना घराबाहेर पडण्यास कचरले, काही ठिकाणी कमी मतदान झाले. याच पार्श्वभूमीवर काही उपाययोजना करण्यात येणार आहे. मुंबईत २० मे रोजी मतदान होणार आहे. मुंबईत ९ हजार ८६२ मतदान केंद्रे आहेत. त्यात शहरात २ हजार ५०९ तर उपनगरात ७ हजार ३५३ मतदान केंद्रे आहेत. मतदान केंद्रांवर मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना उन्हामध्ये रांगा लावाव्या लागणार आहेत. मे महिना हा उन्हाळ्याचा महिना असल्याने या कालावधीत अधिक तापमान असण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊनच निवडणूक आयोगाकडून केंद्रावर येणाऱ्या नागरिकांसाठी आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर आरोग्य सेवा पुरविण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाकडून मुंबई पालिकेवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे पालिकेने निवडणूक केंद्रांवर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आपला दवाखाना, आरोग्य केंद्र आणि डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा फायदा होऊन मतदानाचा टक्का वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.**

# हुकूमशाही नष्ट करा, संविधान वाचवा

## आ. जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन





। अलिबाग । प्रतिनिधी ।

बदलत्या राजकारणामुळे देश हुकूमशाहीच्या वाटेवर आहे. ही हुकूमशाही नष्ट करण्यासाठी, संविधान वाचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी या निवडणूकीत प्रचंड मेहनत घेतली पाहिजे. रायगड लोकसभेची निवडणूक ही आपल्या सर्वांसाठी अस्तित्वाची असणार आहे. निष्ठावंत अनंत गीते यांच्या रुपाने महाविकास आघाडीचे उमेदवार लाभले आहेत. त्यांना निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले.

रोहा तालुक्यातील चणेरा येथील कुणबी समाज हॉल येथील प्रांगणात इंडिया आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची सभा रविवारी (दि.२८) घेण्यात आली. यावेळी आ. जयंत पाटील बोलत होते. सध्याचे राजकारण हे गलिच्छ आहे. सर्वसामान्यांना वेठीस धरणाचे काम केले जात आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या महागाईमुळे सर्वसामान्य त्रस्त झाले आहे. सरकार विरोधात बोलणाऱ्यांवर वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणेतून दबाव आणला जातो. ही मोठी शोकांतिका असल्याचे आ. जयंत पाटील म्हणाले.

मागील निवडणूकीत ज्यांना आपण निवडून दिले. तेच आपल्याला विसरून गेले आहे. आपल्याशी गद्दारी करण्याचे काम केले आहे. या निवडणूकीत गद्दारांना जागा दाखविण्याची वेळ आली आहे. फसवेगिरी करणाऱ्यांना चिरडण्याची ही वेळ आहे. त्यानुसार प्रत्येकाने काम करून अनंत गीते यांना या निवडणूकीत निवडून देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घ्या, असे आवाहन आ. जयंत पाटील यांनी केले आहे.

यावेळी माजी आ. पंडित पाटील, महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते, शिवसेना उध्दव ठाकरे गट जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, समीर शेडगे, विष्णू पाटील, शेख सुभानअली आदी मान्यवरांसह शेकाप व इंडिया आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास कामांकडे तटकरेंचे दुर्लक्ष

**रायगड जिल्ह्यातील अलिबाग – रोहा, मुंबई गोवा हायवे असे अनेक प्रश्न तटकरे सोडवतील म्हणून त्यांना मागच्यावेळेला निवडून दिले. मात्र, निवडून आल्यावर त्यांनी त्याकडे लक्षच दिले नाही. फक्त सरकारकडे पाठपूरावा सुरु असल्याच्या बतावण्या करण्याचे काम केले. विकासाच्या बाता मारणाऱ्या सुनील तटकरे यांनी पाच वर्षात काय केले असा संतप्त सवाल माजी आ. पंडित पाटील यांनी उपस्थित करीत त्यांचा पाढाच वाचून दाखविला.**

## पेणमध्ये इंडिया आघाडीची आढावा बैठक



●पेणमध्ये इंडिया आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आ. जयंत पाटील यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी, विष्णू पाटील, महादेव दिवेकर, पी.डी.पाटील, गुरूनाथ मांजरेकर, अशोक मोकल, समीर म्हात्रे, जगदीश ठाकूर, अनंत पाटील, प्रकाश शिंगरूत, छाया काईनकर आदी उपस्थित होते.

## रामराज विभागात अनंत गीते यांचा प्रचार दौरा





● अनंत गीते यांच्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोमवारी (दि २९) रामराज विभागात प्रचार दौरा केला. याप्रसंगी गोवोगावी त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.



● अनंत गीते यांच्या प्रचार सभेत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील. (छायाचित्र : समीर मालोदे)

## वे|ध|क

### खालापूरातून संजोग वाघेरेंना मताधिक्य देऊ : शिवानी जंगम

**खोपोली :** श्रीरंग बारणे खासदार असताना दहा वर्षात एकही विकासकाम केलं नाही. तसेच मी नगराध्यक्षा असताना निमंत्रण देऊन एकदाही कार्यक्रमाला आले नसल्याचा आरोप खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा तसेच विद्यमान नगरसेविका शिवानी जंगम यांनी केले आहे. आता आम्हाला जमीनीवरचा, आमच्या बरोबरचा खासदार पाहिजे असे सांगत महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांनी खालापूर शहरातून मोठा लीड देवू असा विश्वास व्यक्त केला आहे.

यावेळी जंगम म्हणाल्या की महायुतीने ४०० पार केले तर संविधान बदलू शकता आणि ही निवडणूक शेवटीची असेल. त्यामुळे इंडिया आघाडीतील पदाधिऱ्यांनी मेहनत घेवून आपल्या उमेदवारांना निवडून आणलं पाहिजे. खालापूरात तर शिवसेना ठाकरे गटाचे नवीनदादा घाटवळ, उमेश गावंड आणि शेकापक्ष एकत्र आल्याने संजोग वाघेरेंना मोठी मताची आघाडी देवू असा विश्वास व्यक्त केला आहे. इंडिया महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील अष्टविनायकापैकी महडच्या वरदविनायकाच्या दर्शनासाठी आले होते. यावेळी खालापूर शहरातील महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी वाघेरे यांचे जोरदार स्वागत केले. शिवसेना ठाकरे गटाचे सल्लागार नवीन घाटवळ, एस. एम .पाटील, खालापुर तालुका प्रमुख पिंगळे, संपर्कप्रमुख उमेश गावंड, शेकाप नेते खालापूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष शेकाप नेते संतोष जंगम, माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम, संभाजी पाटील, नितीन पाटील, सुविधा, विचारे मंदा भोसले, तेजस पाटील आदी प्रमुखांसह इंडिया आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुस्लिम, बौद्ध, कुणबी समाजाची तटकरेंवर नाराजी

**महाड :** रायगड लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून राष्ट्रवादीचे सुनील तटकरे आणि इंडिया आघाडीकडून शिवसेनेचे अनंत गीते रिंगणात आहेत. तटकरेंना निवडून येण्यासाठी मुस्लिम, बौद्ध आणि कुणबी मतांची टक्केवारी निर्णायक ठरणार आह. मात्र, विविध प्रकारची आमिषे दाखवून देखील मतदार आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसून येत आहे. तटकरेंनी यापूर्वी राज्य सरकारमध्ये विविध मंत्री पदे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भूषवली आहेत. जिल्हा परिषद सदस्य ते कॅबिनेट मंत्री पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद अशी विविध पदे तटकरे यांनी सांभाळली आहेत. मात्र, राजकारण करताना तटकरे यांनी आपल्या सोबत काम करणाऱ्या विविध नेत्यांना आणि पक्षांना धोका देत आपला स्वार्थ साधण्याचा काम केलं आहे. त्यांच्या या गुणाबाबत अनेक वेळा विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी स्थानिक आमदारांनी टीकेची जोड देखील उठवले आहे.

तटकरे यांनी शरद पवारांची साथ सोडल्यानंतर आणि भाजप बरोबर हात मिळवणी केल्यामुळे रायगड लोकसभा मतदारसंघ त्यांच्याबाबत प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. ही नाराजी या निवडणुकीत मतदानाच्या माध्यमातून मतदार काढतील असा संशय निर्माण झाल्याने महाविकास आघाडीकडून भाजपचे बडे नेते रायगड लोकसभा मतदारसंघात तळ ठोकून आहेत. एकीकडे ज्या भरत शेठ गोगावले यांनी यापूर्वी तटकरे यांच्यावर टीकेची जोड उठवली होती आणि मोदींना पाठिंबा देण्यासाठी गीते यांना मतदान करा असे आवाहन केले होते तेच भरत गोगावले आता मोदींना पाठिंबा देण्यासाठी तटकरे यांना मतदान करा असे गावोगावी सांगत आहेत त्यांच्या या दुटप्पी आवाहनामुळे ग्रामीण भागातील जनता नाराज झालेले आहे. तोंडावर कोणीही बोलत नसले तरी मत पेटीतून ही नाराजी व्यक्त होणार असल्याचे सांगितले जात आहे. भाजप विरोधी वातावरणाचा फटका सुनील तटकरे यांना बसण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवरील राष्ट्रवादीचे नेते, आठवले गटाचे पुढारी गावोगाव फिरत आहेत. मात्र, मुस्लिम बौद्ध आणि कुणबी समाजामध्ये त्यांना फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसून येत आहे, यामुळे आता वेगवेगळी आमिष दाखवण्याचा प्रयत्न होत आहे मात्र ही आमिष देखील धुडकावली जात आहेत.

## बारणेंच्या रॅली दरम्यान झेंड्याला आग

। पनवेल । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या रॅली दरम्यान करण्यात आलेल्या फटाक्याणच्या आतषबाजीमुळे झेंड्याला आग लागण्याची घटना कामोठे वसाहतीत घडली आहे. मावळ मतदार संघाचे उमेदवार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.२८) कामोठे वसाहतीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेपूर्वी एमएन आर चौकात रॅली आली असता उमेदवाराच्या स्वागतासाठी करण्यात आलेल्या फाटक्यांच्या आतषबाजीमुळे चौकात लावण्यात आलेल्या झेंड्याला आग लागली.

## महायुतीतील घटक पक्षांचे सूर जुळेना?

। नेरळ । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभा मतदारसंघात कर्जत विधानसभा मतदारसंघ महायुतीचे उमेदवार यांच्यासाठी सतत अडचणीचे ठरत आहे. निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असताना देखील महायुतीमधील घटक पक्षांचे काही पटताना दिसत नाही. प्रचारात शिवसेनेसोबत भारतीय जनता पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसेकडून प्रचारात सहभाग घेतला जात आहे. मात्र, तरी देखील महायुतीमधील घटक पक्षांचे सूर काही मिळाले नाहीत असेच चित्र आहे. निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या चारही घटक पक्षांसोबत स्वतंत्र बैठका लावल्या आहेत. दरम्यान, महायुतीतील असे जुळणारे सूत मतपेटीत परावर्तित दिसणार का? याचे टेन्शन महायुतीचे उमेदवार यांना असणार आहे.

कर्जत मतदारसंघात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच शिवसेना आणि भाजपमधील काही कार्यकर्त्यांचे जमत नसल्याचे जग जाहीर आहे. मात्र, मावळ लोकसभा निवडणुकीचा प्रचार संपताना तरी असे चित्र कर्जत विधानसभा मतदारसंघात दिसून येईल कि नाही अशी शंका मात्र नाकी आहे.

## कासु विभागातुन गीतेंना आघाडी देणार



। गडब । वार्ताहर ।

रायगड लोकसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीकडून उध्दव बाळासाहेब पक्षाचे उमेदवार अनंत गिते यांच्या प्रचारार्थ कासु विभागातील गावांमध्ये गावनिहाय प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी नागरिकांनी ङ्गकहो दिलसे अनंत गीते फिर सेफ असा नारा दिला. तसेच, मफक्त विजय नको, ऐतिहासिक विजय मिळवायचाफ असा निर्धार केला. इंडिया आघाडीचे कार्यकर्ते प्रचाराला जोमाने उतरले आहेत. यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख विष्णु पाटील, जिल्हा समन्वयक नरेश गांवड, वाहतूक सेनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश पोरे, उपतालुका प्रमुख हीराजी चोगले, जयराज तांडेळ विभाग प्रमुख गजानन मोकल, शेकापक्षाचे बाजार समितीचे माजी उपसभापती लक्ष्मण गांवड, महीला आघाडीच्या दिपश्री पोटफोडे, युवासेनेचे कासु विभाग अधिकारी निशांत पाटील, वाहतुक सेनेचे अच्युत पाटील, उत्तम वाघ, नरेश सोनावणे, आदिसह इंडिया आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



## मशालीसमोर घड्याळ असल्याने गीतेंचा विजय सोपा

### आस्वाद पाटील यांचा आघाडीच्या मेळाव्यात दावा



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

रायगड मतदार संघामध्ये इंडिया आघाडी झाल्याने अनंत गीते यांची उमेदवारी नक्की झाली. राज्यात महाविकास आघाडी झाली तेव्हा विद्यमान खासदार म्हणून उमेदवारी तटकरेंना गेली असती. पण तटकरे अजित पवार गटाकडे गेले आणि गीते यांचे स्टार चांगले असल्याने त्यांची उमेदवारी चार महिने आधीच शरद पवार आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्या उपस्थितीत जयंत पाटील यांनी मागितली. आता मशालीसमोर घडयाळ असल्याने गीतेंचा विजय सोपा झाली आहे. मशालीसमोर धनुष्यबाण असता तर जी धावाधाव झाली असती त्यामुळे कार्यकर्त्यांची खाज मोडली असती, असे ओघवत्या शैलीतील भाषणात शेकापक्षाचे युवा नेते ॲड.आस्वाद पाटील यांनी गीते यांच्या विजयाचा दावा चोळई येथील आघाडीच्या मेळाव्यात केला.

अनंत गीते यांची निशाणी आता मशाल आहे. आम्ही निशाणीचा बाऊ केला नाही. निशाणीवर विजय अवलंबून असता काँग्रेस सत्तेत राहिल. महाडकर कायम पुरात असतं पण ते घर सोडत नाही. राजकीय पक्ष आणि कार्यकर्ते विचारांशी ठाम राहिले तर पक्ष सोडण्याचा प्रकार घडत नाही.

तटकरेंना प्रत्येक बूथला एक मत कमी पडल्याने त्यांचा पराभव झाल्याचे जेव्हा आपण मतमोजणी दरम्यान २०१४ मध्ये त्यांना सांगितले तेव्हा मतदार संघात २२०० बूथ होते. म्हणून प्रत्येक मत महत्वाचे आहे, असे आवर्जून सांगितले.

शिवसेनेच्या मुळ कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन, खरी शिवसेना आणि खरी शिवसेना असे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले पण ज्यांना खरं म्हटलं त्यांच्या खासदारांना पुन्हा उमेदवारी दिली नाही; मग खऱ्या शिवसेनेची खरोखरच फसवणूक झाली, असा संदेश पोहाचविला पाहिजे, असे आवाहन यावेळी ॲड. पाटील यांनी केले.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक अस्लम राऊत, महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप-कामत, जिल्हा बँकेचे संचालक हनुमंत जगताप, धनंजय देशमुख, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष कृष्णा करंजे, जिल्हा बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड, नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेता दिलीप भागवत, पद्माकर मोरे, तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, मुजम्मील तांबे, महंमद मुजावर, चंद्रकांत सणस तसेच अन्य पदाधिकारी कार्यकर्जे उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष वैभव चांदे यांनी सुत्रसंचलन केले.

## मुरुडमध्ये मुस्लिम समाजाचा निर्धार मेळावा



। अलिबाग । प्रतिनिधी ।

इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ मुरुडमध्ये मुस्लीम समाजाचा निर्धार मेळावा रविवारी (दि. २८) रोजी आयोजित करण्यात आला होता. शेकाप नेते आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडला. यावेळी अनंत गीतेंना भरघोस मतांनी निवडून देण्याचा निर्धार असंख्य मुस्लीम समाजाने केला. मुस्लीम समुदायांना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक उन्नतीसाठी व त्यांच्या भागातील प्रत्येक विकास कामांसाठी भरपूर योगदान दिले जाईल अशी ग्वाही यावेळी आ. जयंत पाटील यांनी दिली.

भाजपकडून वारंवार मुस्लीम समाजाचा अपमान केला जात आहे. घटनेने दिलेले अधिकार समाप्त करण्याची भाषा केली जात आहे. सुनील तटकरे भाजपबरोबर जाऊन निवडणूक लढवित असल्याने त्यांच्याबद्दल मुस्लीम समाजात खूप नाराजी आहे. ईडीच्या भितीबरोबरच स्वतःचा आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी भाजपबरोबर गेल्याने त्यांच्याबद्दल तीव्र संताप आहे. त्यांनी मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. तटकरे केवळ विकास कामांचे अमिष दाखवून काही मुस्लीम व्यवसायिकांना त्यांच्याकडे आकर्षित करत आहेत. परंतु असंख्य मुस्लीम समाज हा इमानाचा व देशाच्या घटनेचा कधीच सौदा करणार नाही अशी प्रतिक्रिया मुस्लीम मराठी संघाचे प्रमुख प्रतिनिधी सुभान शेख तसेच शकील कडू यांनी व्यक्त केल्या. मुरुड येथील अकिल खतीब यांच्या निवासस्थानी हा मेळावा आयोजित केला होता. तालुक्यातील असंख्य मुस्लीम कार्यकर्ते, मतदार व महिला मोठ्या संख्येने या मेळाव्यात सहभागी झाले होते.

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची उपस्थिती

## आदिवासी बोली भाषेत मतदान जागृती

। पाली । वार्ताहर ।

गटविकास अधिकारी पेण, भाऊसाहेबपोळयांच्यासंकल्पनेतूनपेण पंचायत समिती शिक्षण विभागाकडून 'हा डाग चांगला' आहे या आदिवासी बोलीभाषेतील लघुपटाचीनिर्मिती करुन मतदानाबाबत जनजागृती केली जात आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून वेगवेगळ्या माध्यमातून मतदारांमध्ये जनजागृती केली जाते. कार्यक्रमांतर्गत वेगवेगळ्या आस्थापनांकडून मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी, पथनाट्य यांसारखे उपक्रम राबवले जात असतानाच आदिवासी बोलीतील हा लघुपट उल्लेखनीय व प्रभावी ठरत आहे.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# ...म्हणे यांनी जगवले

पेण इथे देवेंद्र फडणवीसांची सभा घेऊन भाजपवाले आता कामाला लागल्याचे चित्र उभे करण्यात आले. पण सुनील तटकरेंना भाजपच नव्हे तर शिंदे गटाच्या नेत्यांचा ठाम विरोध होता व अजूनही आहे. भाजपच्या नेत्यांनी ठराव करून व बैठका घेऊन रायगडची निवडणूक आपणच लढवायला हवी असे म्हटले होते. मुंबईतल्या नेत्यांनी ते ऐकले नाही. अर्थात, वर नेत्यांनी काहीही निर्णय घेतला तरी खालच्या कार्यकर्त्यांनी आधीच निर्णय घेतला होता. आपल्या मित्रांचा विश्वासघात करणाऱ्या आणि कामे न करणाऱ्या नेत्यासाठी आपण प्रचार करणार नाही हे ठरवून टाकले होते. राष्ट्रवादीवाल्यांना त्याची जोरात झळ लागली. मग वर तक्रारी झाल्या. शेवटी कार्यकर्त्यांना समजवण्यासाठी खुद्द फडणवीसांना यावे लागले. वास्तविक आजवर भाजपला या जिल्ह्यात नगण्य स्थान होते. म्हणून मग इतर पक्षांमध्ये फोडाफोडी करून पक्ष वाढवला असे भासवण्यात आले. पण अमित शाह यांच्या सल्ल्याने फोडाफोडी इतक्या झाल्या की आधी फोडून आणलेले वाऱ्यावर पडले. राष्ट्रवादीवाल्यांना एका झटक्यात नऊ मंत्रिपदे मिळाली. भाजपचे जुनेजाणते सतरंज्या घालत राहिले. भाजपमध्ये नव्याने दाखल झालेल्यांची तर ना घर का ना घाट का अशी स्थिती झाली. रायगडमध्येच नव्हे तर सर्वच जिल्ह्यांमध्ये कार्यकर्त्यांच्या हातापाया पडण्याची वेळ आली. अमरावतीमध्ये नवनीत राणाला पक्षाची उमेदवारी द्यायला स्थानिक सर्व भाजप नेत्यांचा विरोध होता. त्याचा परिणाम निकालात दिसेलच. गडचिरोली, माढा, सांगली, नंदूरबार, लातूर अशा अनेक ठिकाणी हीच स्थिती आहे. दिल्लीश्वरांच्या हिशेबाने चालायचे झाले की हे असेच घडणार. मग जागोजागी जाऊन स्थानिक नेत्यांना बाबापुता करणे याखेरीज पर्याय राहत नाही. पण या नेत्यांना काही देणे न देणे हेही देवेंद्र वा तत्समांच्या हातात उरलेले नाही. त्यामुळे पेणमध्ये येऊनही फोडून आणलेल्या नेत्यांचे पुनर्वसन कसे होणार यावर त्यांनी चकार शब्द काढला नाही. शेवटी काहीतरी बोलून सभा गुंडाळावी लागली.

## खासदारांनी काय दिवे लावले?

वरकरणी भरमसाठ आश्वासने असली तरी प्रत्यक्षात काहीही ठोस पदरात नाही अशी नव्याने भगवे उपरणे घातलेल्यांची अवस्था आहे. त्यामुळे हे लोक रायगड किंवा अन्यत्रही या पक्षाचे काम मनापासून करणार नाहीत हे स्पष्ट आहे. तसेही हे प्रचाराला गेलेच तर सामान्य जनतेच्या रागाला व सरबत्तीला तोंड द्यावे लागेल. खासदारांनी काय दिवे लावले आहेत सर्वांनाच ठाऊक आहेत. त्यामुळे त्यांच्याविषयी कोणी बोलणार नाही. मोदी सरकारने दहा वर्षात केले काय याचाच हिशेब अधिक मागितला जाईल. त्या आघाडीवर उत्तरे देणे किती अवघड आहे याचा प्रत्यय देवेंद्राच्या भाषणावरून आला. मोदींच्या विकासाला नाही तरी किमान त्यांनी कोरोनात दिलेल्या लसीची आठवण ठेवून तरी मते द्या अशी विनवणी करण्याची वेळ त्यांच्यावर आली. अर्थात, हे करतानाही ते भाजपवाल्यांच्या सवयीप्रमाणे खोटे बोललेच. कोरोनाची लस मोदींनी फुकट देऊन या देशाला जगवले असा धडधडीत असत्य दावा त्यांनी केला. सामान्य माणसांची आठवण थोडी कमी असते. शिवाय, मुख्यमंत्री वगैरे राहिलेला माणूस खरेच बोलत असेल असे ते समजतात. त्यांच्यासाठी काही गोष्टींची आठवण करून द्यायला हवी. कोरोनाच्या भीषण संकटाच्या काळातही मोदींनी पदोपदी राजकारण केले. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने उत्तम काम केले असे प्रशस्तीपत्र खुद्द सर्वोच्च न्यायालय तसेच जागतिक आरोग्य संघटना यांनी दिले. मुंबई व धारावीतील कामाची प्रशंसा केली. मोदी सरकार व त्यांची भाजपची पिलावळ यांनी मात्र कायम उद्धव यांना दूषणे दिली. तेव्हा सरकारात सामील असलेले एकनाथ शिंदे यांनी गद्दारी केल्यानंतर आता तेही उद्धव यांच्यावर कोरोना काळात घरी बसून राहिले अशी टीका भाजपच्या नादाने करीत असतात. ऐन कोरोना काळात मोदींनी बंगालात जाऊन लाखालाखांच्या प्रचारसभा घेतल्या. शेवटी लाजेकाजेस्तव निवडणूक आयोगाला त्यावर बंदी घालावी लागली.


## भाजपचा बकवास

लसीकरणाचेही मोदींनी असेच राजकारण केले. बिहार निवडणुकांमध्ये भाजप निवडून आला तर बिहारी जनतेला फुकट लस दिली जाईल असे आश्वासन देण्यात आले. २०२० मध्ये भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात त्याचा समावेश होता. देशातील एकाच राज्याच्या लोकांना अशी फुकट लस कशी देणार असा सवाल तेव्हा विरोधकांनी केला होता. याचा अर्थ सर्वांना फुकट लस दिली पाहिजे असे मोदींच्या मनात नव्हते. केवळ भाजप-शासित राज्यांमध्ये अशी लस देऊन मते उकळण्यासाठी नवा मुद्दा करायचा असला क्षुद्र विचार त्यांच्या डोक्यात होता. २०२१ मध्ये प्रत्यक्ष लसीकरणाला सुरुवात झाली. एप्रिलमध्ये केंद्र सरकारने धोरण जाहीर केले. त्यानुसार उपलब्ध लसीपैकी पन्नास टक्के लस केंद्र सरकार उचलणार होते. ती ते डॉक्टर्स व ४५ च्या वरच्या लोकांना लोकांना फुकट देणार असल्याने त्यांना सवलतीच्या दराने मिळणार होती. बाकीची पन्नास टक्के लस राज्य सरकारांनी आणि खासगी इस्पितळांनी खुल्या बाजारातून चढ्या किमतीने घ्यावी असे केंद्राचे म्हणणे होते. त्यावेळी लसीला खूप मागणी होती. साहजिकच सर्व राज्यांमध्ये लस मिळवण्यासाठी स्पर्धा होणार होती. खासगी इस्पितळे भरमसाठ दर देऊन तिचा काळाबाजार करण्याचा धोका होता. अनेक राज्य सरकारांकडे लस खरीदण्यासाठी पैसे कुठून आणायचे ही चिंता होती. पण मोदी सरकारला याची पर्वा नव्हती. त्यातच केंद्राकडची जी लस शिल्लक राहील ती भाजपशासित राज्यांना देण्याचाही त्याचा डाव होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेथे केंद्र सरकारच्या धोरणाचे वाभाडे निघाले. काहींना फुकट व बाकीच्यांना विकत हे चालणार नाही असे न्यायालयाने बजावले. त्यामुळे मोदींना ती योजना बदलावी लागली. सर्वांना फुकट लस द्यावी लागली. सारांश, मोदींनी लोकांना जगवले वगैरे जे फडणवीस सांगत आहेत तो एक बकवास आहे. अर्थात, ठोस काही केलेले नसले की असल्याच खोट्या गोष्टींचा आधार घ्यावा लागत असतो. याचा हिशेब लोक करतीलच.

विचार

# ‘मॉरिशस रूट’ टाळण्यासाठी...

*भारतातून मॉरिशसला निधी पाठवायचा, तेथे कंपनी स्थापन करायची आणि मग तो पैसा परत भारतात आणायचा, याला ‘मॉरिशस रूट’ असे म्हणतात. हे काळे व्यवहार थांबवणे, हे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. भारताने अलिकडेच मॉरिशसबरोबर दुहेरी कर टाळण्यासाठी करारात दुरुस्ती केली. करचुकवेगिरी करण्याच्या प्रकारांना आळा घातला जावा, म्हणून ही दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यातून उद्दीष्ट्य कितपत साध्य होते, ते पहायचे.*



**हेमंत देसाई**

कर टाळणे आणि कर चुकवणे या दोन्ही पद्धती करदायित्वे कमी करण्यासाठी वापरल्या जातात. कर टाळताना काही व्यक्ती आणि व्यवसाय करदायित्वे कमी करण्यासाठी कायदेशीर पद्धतींद्वारे आपल्या आर्थिक व्यवहारांची रचना करतात. यामध्ये करसवलती, कपात आणि कर कायद्यांच्या चौकटीत उपलब्ध असलेल्या त्रुटींचा लाभ घेणे समाविष्ट असते. कर टाळण्याच्या धोरणांना कायदेशीर मानले जाते आणि कर नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी कर व्यावसायिकांच्या सहाय्याने अनेकदा अंमलबजावणी केली जाते. कर टाळण्यामुळे कराचा कमी भरणा होऊ शकतो; परंतु त्यात फसवणूक, चुकीचे वर्णन किंवा बेकायदेशीर क्रियाकलाप समाविष्ट नसतात. दुसरीकडे, सरकारला देय असलेला कर भरू नये म्हणून जाणीवपूर्वक चुकीची माहिती देणे किंवा आर्थिक माहिती लपवणे ही बेकायदेशीर प्रथा आहे. यामध्ये उत्पन्नाचा अहवाल जाणूनबुजून कमी करणे, कपात वाढवणे, आर्थिक मालमत्ता लपवणे किंवा कर भरणे टाळण्यासाठी इतर फसव्या क्रियाकलापांमध्ये गुंतणे यांचा समावेश होतो. करचुकवेगिरी हा कायद्याने दंडनीय फौजदारी गुन्हा आहे आणि त्यामुळे दंड, तुरुंगवास आणि नागरी उत्तरदायित्व यासह गंभीर दंड होऊ शकतो. कंपन्या आणि व्यक्ती जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी आणि आर्थिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी कर आश्रयस्थानांचा वापर करतात. अनेक देशांना गुंतवणुकीसाठी अनुकूल कर दर आणि धोरणांचा परिणाम म्हणून आधुनिक कॉर्पोरेट कर आश्रयस्थान मानले जाऊ शकते; परंतु व्यवसाय चालवण्याची किंमत, संसाधनांशी जवळीक, परकीय गुंतवणुकीची सुलभता आणि आयात आणि निर्यात शुल्क दर यासारखे घटक कमाईवर परिणाम करू शकतात.

सर्वोत्तम कर आश्रयस्थाने गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त नफा मिळवण्यास सक्षम करतात. मात्र अनेक देशांमध्ये गैरमार्गाने गुंतवणूक करुन, तिथल्या सैल नियमांचा आधार घेऊन अनेक व्यक्ती आणि कंपन्या उलटसुलट व्यवहार करतात. जगात केवळ मॉरिशस हाच टॅक्स हेवन देश नाही, तर असे आठ देश आहेत. तिथे करसवलतीसाठी किंवा कर चुकवण्यासाठी शेल कंपन्या स्थापन केल्या जातात. भारतासह जगातील अनेक देश मग अशा देशांचा आधार घेतात. मात्र अलिकडेच भारताने मॉरिशससोबत यासंदर्भात विशेष करार केल्यामुळे करचुकवेगिरीला आळा बसून देशाच्या उत्पन्नात भर पडू शकते. या निमित्ताने करचुकवेगिरीचे प्रकार त्यांचा प्रतिबंध आदी मुद्दे समोर आले आहेत.

भारताने अलिकडेच मॉरिशसबरोबर दुहेरी कर टाळण्यासाठी करारात दुरुस्ती केली. करचुकवेगिरी करण्याच्या प्रकारांना आळा घातला जावा, म्हणून ही दुरुस्ती करण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये मॉरिशस हा भारतासाठी थेट विदेशी गुंतवणुकीचा, म्हणजेच एफडीआयचा तिसरा सर्वात मोठा स्रोत होता. सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया, अर्थता सेबीने दहा वर्षांपूर्वी दिलेल्या आकडेवारीनुसार, त्यावेळी मॉरिशसमध्ये नोंदणी असलेल्या विदेशी गुंतवणूकदार संस्था किंवा एफआयआयकडून भारतात ३ लाख ७१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती. मात्र मॉरिशसमधून काळ्या पैशांचे व्यवहार प्रचंड प्रमाणात होतात, असा आरोप झाल्यावर त्या देशाची पत कमी झाली. तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने मॉरिशसकडून ९७ प्रकरणांबद्दलची गुंतवणुकीची माहिती मागवली होती. नरेंद्र मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर तेव्हाच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी मॉरिशसचा दौरा केला. दुहेरी करनिर्धारण कराराबाबत (डीटीएए) मॉरिशसला असलेल्या शंकांचे निरसन करतानाच सुषमाजींनी तेथील कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याचे निमंत्रण दिले होते. त्यांनी ‘मेक इन इंडिया’ या उपक्रमात अधिकाधिक गुंतवणूक करण्याचे आवाहनही केले होते.

तीन वर्षांपूर्वी भारत-मॉरिशस यांच्यात व्यापक आर्थिक सहकार्य व भागीदारीच्या करारावर पोर्ट लुईस येथे स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानुसार, भारताला मॉरिशसमध्ये अन्नपदार्थ व पेये, कृषी उत्पादने, कपडे, धातू, प्लास्टिक, रसायने, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू, लाकडी वस्तू वगैरे ३१० वस्तूंची निर्यात करण्याची परवानगी देण्यात आली होती. दुसरीकडे, मॉरिशसला गोठवलेले मासे, साखर, बिस्किटे, ताजी फळे, फळांचे रस, बाटलीबंद पाणी, बियर, मद्य, साबण पिशव्या, वैद्यकीय व शस्त्रक्रिया उपकरणे आणि कपड्यांसह एकूण ६१५ उत्पादने भारतात पाठवण्याची सोय या करारामुळे झाली होती. आता दुहेरी करआकारणी टाळण्याविषयीच्या करारात करण्यात आलेल्या दुरुस्तीमागे करचोरीच्या वाटा बंद करणे, हा मुख्य हेतू आहे. शेअर्सच्या विक्रीतून होणाऱ्या भांडवली फायद्यावर मॉरिशसमध्ये कर नसल्यामुळे भारतातून त्या देशात मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवला जात होता. त्यानंतर २०१६ मध्ये यात दुरुस्ती करण्यात आली आणि हा कर आकारण्याचा अधिकार मॉरिशसला देण्यात आला.

उभय देशांमधील डीटीएएच्या तरतुदीमुळे फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्स (एफपीआय) आणि फॉरेन एंटिटीज आपल्या भारतातील गुंतवणुका मॉरिशसमार्गे करत होत्या. अमेरिका, सिंगापूर आणि लक्झेम्बर्गनंतर भारतात अशा प्रकारची सर्वाधिक गुंतवणूक मॉरिशसमधूनच केली जाते. मार्च २०१४ अखेर संपलेल्या वर्षात भारतात ६९ लाख कोटी रुपये एफपीआय गुंतवणूक झाली. त्यापैकी चार लाख १९ हजार कोटी रुपये मॉरिशसमधून आले. परस्परव्यापार आणि गुंतवणूक हा पूर्वीच्या कराराचा मुख्य उद्देश होता. आता सुधारित करारात दुहेरी करआकारणी थांबवणे आणि त्याच वेळी लबाड्या करून करदायित्व टाळण्याच्या फटी बुजवणे, असा उद्देश आहे. परवाना राज पूर्ण संपवणे, निवडणूक पद्धतीत पारदर्शकता आणणे, अर्थव्यवस्थेचे डिजिटलीकरण तसेच विविध कल्याणकारी योजनांचा पैसा थेट नागरिकांच्या खात्यात जमा करणे, या उपायांमुळे भारतातील काळा पैसा काही प्रमाणात कमी झाला आहे. १९८३-८४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार, त्यावेळी भारतात ३२ ते ३७ हजार कोटी रुपयांचा काळा पैसा होता. सीबीआयच्या माजी संचालकांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात एकूण ४०० ते ५०० लाख कोटी रुपये इतका काळा पैसा आहे. हा आकडाही काही वर्षांपूर्वीचा आहे. ‘ग्लोबल फायनान्स इंटिग्रिटी’ने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये स्वतंत्र भारतातील सरकारच्या स्थापनेपासून काळ्या पैशाची माहिती जमा करण्यात आली होती. त्या अहवालानुसार, १९४८ ते २००६ या वर्षांमध्ये सुमारे ४६२ अब्ज इतकी डॉलर इतकी रक्कम देशाबाहेर पाठवण्यात आली.

पंधराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष एन. के. सिंग यांनी देशातील करांचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले गुणोत्तर सुधारले पाहिजे, असे मत पूर्वी सार्थपणे व्यक्त केले होते. कर आणि राष्ट्रीय उत्पन्नाचे गुणोत्तर सामान्यतः १५ टक्के इतके असावे, असे मानले जाते. बेल्जियम, स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स या देशांमध्ये हे गुणोत्तर ४० टक्क्यांपेक्षा जास्त आहे तर भारताचे ११.२ टक्क्यांच्या आसपास आहे. कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे आवश्यक असते. आर्थिक मंदी वा कोरोनासारख्या संकटांच्या काळात सरकारी महसूल घटतो. म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्क्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे ६५ टक्के आणि ३५ टक्के असे असते. तर भारतात ते अनुक्रमे ४८ टक्के आणि ५२ टक्के असे आहे. मॉरिशस हा ‘टॅक्स हेवन’ देश मानला जातो. तेथील भांडवली लाभावर केवळ १५ टक्के कर आहे. भारतात येणारे निम्मे विदेशी भांडवल हे मॉरिशसच्या मार्गे येते. भारतातून मॉरिशसला निधी पाठवायचा, तेथे कंपनी स्थापन करायची आणि मग तो पैसा परत भारतात आणायचा, याला ‘मॉरिशस रूट’ असे म्हणतात. हे काळे व्यवहार थांबवणे, हे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. ताज्या करार-मदारांमधून हे कितपत साध्य होते, ते आता बघायचे.

आजकाल

# हे विकासाचे वारकरी की मारेकरी?

**विजयकुमार काळे**

मुंबई - गोवा महामार्गबाबत आजपर्यंत बरंच बोललं आणि लिहिलं गेलेले आहे. तीन दिवसापूर्वी काही कामानिमित्त गुहागर येथे जाण्याचा योग आला होता. गुहागरला जाताना ही रायगड जिल्ह्यातील या रस्त्याच्या राखडलेल्या कामामुळे त्रास झालाच. ठाणे मुक्कामी परतत असताना रायगड जिल्ह्याच्या रोहा तालुक्यातील आंबेवाडी नाका परिसरात रस्ता रुंदीकरणासाठी अधिग्रहित केलेल्या रस्त्यांची जागा अजूनही केवळ आखणी करूनच थांबलेली दिसली. आणि तीही तब्बल सात -आठ वर्षे! विशेष म्हणजे महामार्गांवर जागोजागी राष्ट्रवादीचे लोकसभा उमेदवार सुनील तटकरे यांचे ‘विकासाचा वारकरी’ असे फलक लागलेले दिसले. आणि खेदाची बाब म्हणजे रोहे तालुक्यातील हा परिसर म्हणजे तटकरे यांचे ‘होम पीच’ असूनही या रस्त्याचा ‘विकास’ अजून का रखडला आहे हे समजणे अनाकलनीय आहे. कारण गेली पाच वर्षे स्वतः साहेब खासदार आणि कन्या सुमारे अडीच वर्षे पालकमंत्री होत्या. इतका दीर्घकाळ सत्तेत असूनही विकास होत नसेल तर विकासाच्या नावाने टाळ कुटणे आता कुणालाही आवडणारे नाही असे स्थानिक जनतेचे म्हणणे आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे बांधकाम सुमारे १७/१८ वर्षे रखडलेले आहे. शिवाय प्रत्येक दीड दोन किलोमीटर्स नंतर परिवर्तन मार्ग असतात. या अनोख्या परिवर्तनामुळे प्रवाशांना मात्र नको तेथे त्रास सहन करावा लागतो.



इतकेच न्हवे तर रायगड जिल्ह्यात या रखडलेल्या कामामुळे रसत्याची पार धुळधाण झालेली आहे. परिणामी या जिल्ह्यात सुमारे दोन हजार जर्क्स ना सामोरे जावे लागते, कंबर अक्षरशः ठेचून निघते. ज्येष्ठ तसेच युवकांना मुक्कामी पोचल्यानंतर ‘अस्थीव्यंग डॉक्टर’कडे जाऊन आपली कंबर व शरीर ठीक करून घ्यावे लागते यावर सर्वच रुग्णालयात मोफत उपचार केले जावेत अशीही नागरिकांची मागणी आहे. गुहागरच्या भेटीत अजून एक संतापजनक माहिती हाती आली व ती म्हणजे हे विकासाचे वारकरी म्हणवणारे उमेदवार गेल्या पाच वर्षात पाच वेळाही गुहागरला आलेले नाहीत. गुहागरचा काही पट्टा रायगड लोकसभा मतदार संघाला जोडलेला आहे. दरम्यान केंद्र सरकारच्या या सर्व योजनाना केंद्र सरकार निधी पुरवते मात्र त्यासाठी राज्य सरकारची केवळ स्वाक्षरी पुरते. असे असतानाही राज्य मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री व त्यांचे सहाय्यक संबंधित कंपन्यांकडे निवडणूक निधी पोटी कोट्यावधी रुपयांच्या निधीची मागणी करतात अशी कुजबुज मंत्रालय परिसरात उघड उघड केली जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. सूत्रांनी दिलेल्या या माहितीत जराही अतिशयोक्ती नाही काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यतील मागील सरकार ‘कमिशन’ सरकार होते असे एका जाहीर सभेत सांगितले होते. आता या निवडणूक निधी मागणाऱ्या प्रवृत्तीला ‘कमिशन’ म्हणणार की अजून काही वेगळा शब्द ‘कॉइन’ करणार हे येणारा काळचं ठरवेल!!

लोकसंसद

## उष्णतेच्या झळांनी भाज्या कडाडल्या

उष्णतेच्या झळांनी संपूर्ण राज्य व्यापून गेले आहे. पारा चाळीशीच्या पार गेला आहे. एकीकडे अंगाची लाही लाही होत असतानाच दुसरीकडे घाऊक बाजारात भाज्यांची आवक घटली आहे. परिणामी भाज्यांच्या किमतीही वाढल्या असून याचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसत आहे. अतिउष्णतेचा फटका थेट भाजीपाल्याच्या पुरवठ्याला बसल्याने किरकोळ बाजारात भाज्यांचे भाव कडाडले आहेत. भाज्यांचे भाव १० ते १५ टक्क्यांनी वाढले आहेत. ३० रुपये किलोला मिळणारी वांगी ५० रुपयांवर गेली आहे. बटाट्याची दरांनी किलोमागे चाळीशी गाठली आहे. सिमला मिरची, कारले आणि भेंडीचे भाव किलोमागे साठीत पोहोचले आहेत. चवळीच्या शेंगा दीडशेच्या घरात गेल्या आहेत. लसणाचे दर पुन्हा २०० ते २४० रुपये किलोवर पोहोचले आहेत. मेथी, कोथिंबीर, शेपू, पालक, कांदापात, चाकवत, पुदिना या पालेभाज्यांचे दरही वाढले आहेत. एकीकडे महागाई उच्चांक गाठत असताना दुसरीकडे भाजीपाल्यांचे दरही गगनाला भिडल्यामुळे सर्वसामान्य माणसाचे बजेट कोलमडून पडले आहे.

**-प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**तीस एप्रिल**

**१८४३ :** कादंबरीकार, निबंधकार, भाषांतरकार, संपादक आणि मराठी भाषेचे चिकित्सक अभ्यासक रा. भि. गुंजीकर यांचा जन्म ३० एप्रिल १८४३ रोजी पब्लिक सर्व्हिस कमिशनची परीक्षा पास झाल्यावर ते मुंबईच्या फिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढे हुबळीच्या शाळेत हेडमास्तर आणि शेवटी ॲडिशनल डेप्यूटी एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त झाले. मित्रोदयमधून गुंजीकरांनी लेखनाला प्रारंभ केला. 'विविधज्ञानविस्तार' या मासिकाचे ते संस्थापक, पण संपादक म्हणून सरकारी नोकरीत असल्यामुळे ते आपले नाव छापत नसत. त्यांच्या स्वतंत्र लेखन शैलीत 'मोचनगड, गोदावरी' या कादंबऱ्या, रोमियो अँड ज्युलिएट रुपांतर 'अभिज्ञात शाकुंतल व रोमकेतू विजया' या नाटकांमध्ये केले. सौभाग्यरत्नमाता सरस्वती या ग्रंथातून सारस्वत, यजुर्वेदी, देशस्थ, चित्पावन, कऱ्हाडे, देवरुखे या ब्राह्मण जातीची माहिती दिली आहे. याशिवाय सुबोध चंद्रिका' हा गीतेवर 'कौमुदी' हा संस्कृत व्याकरण ग्रंथ लिहिला. तर ग्रंथ. त्यांचे स्फूट लेखन विपूल आहे. ते गुंजीकार यांचे 'संकलित लेख' या नावाने प्रसिद्ध केले. त्यातील 'मराठी भाषा', 'देशभाषेची दुर्दशा' 'आपत्या भाषेची स्थिती.' 'आपल्या भाषेचे पुढे काय होणार' ह्या त्यांच्या लेखांवरून मराठी भाषेविषयीचा त्यांचा जिव्हाळा लक्षात येतो. 'मोचनगडच्या' रुपाने पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे जनक, तसेच मराठी लघुलिपीचे आद्य उत्पादक अशी ओळख असणाऱ्या आणि स्वभाषेची सेवा हा धर्म मानणाऱ्या या मराठी साहित्यकाराचे १८ जून १९०१ रोजी निधन झाले. **१९१३:-** मराठी व्याकरणकार मोरो केशव दामले यांचे निधन. ११वर्षे संशोधन करुन मराठी व्याकरणाचा एक हजार पानी ग्रंथराज त्यांनी लिहिला. अभ्यासु व्याकरणकारांत त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. शास्त्रीय मराठी व्याकरण या व्याकरण विषयक शुध्दलेखन परिषदेत भाग घेऊन या बाबतची आपली मते ‘शुध्दलेखन सुधारणा आणि सरकारी बंडावा’ या पुस्तकातून मांडलीत. ‘ग्रंथमाला’ या मासिकासाठी ते नियमितपणे लेखन करत असून त्यातील त्यांची ‘विचारीभ्रमण’ आणि ‘आधुनिक असंतोषफ ही पुस्तके तयार झाली. याशिवाय ‘न्यायशास्त्र निगमन आणि न्यायशास्त्र पुस्तक दुसरे निगमन ही तर्कशास्त्रावरील पुस्तकेही त्यांच्या नावावर आढळतात. **१९२४:-** विज्ञान विषयक लेखक रामचंद्र विनायक सोवनी यांचा जन्म. इयत्ता आठवी ते बारावीच्या त्यांनी पाठ्यपुस्तके लिहिली. ‘पृथ्वीची गोष्ट’, ‘मानवी आनुवंशिकता’, ‘मत्स्य जीवन’, ‘चंद्रावर स्वारी’ या पुस्तकांसह विपुल प्रमाणात स्पूट लेखन त्यांनी केले. विज्ञानाचे रचियेते ही वैज्ञानिकांविषयीची त्यांची पुस्तकमाला प्रसिध्द. मराठी विज्ञान परिषदेचे अंकांचे ४० वर्ष संपादन त्यांनी केले. **१९२८:-** बेने इस्त्राएलची मराठी लेखक अब्राहम सामसन शापूरकर यांचे निधन. ‘इस्त्राएल’ या पत्रातून विविध विषयावर लेखन. तसेच ‘शांती’, ‘मक्का बी वीरांचे शौर्य कीर्तन’, ‘मुलांनी करण्याची प्रार्थना’ अशी पुस्तके त्यांनी लिहिली. **१९५०:-** वर्तमानपत्रे, मासिके यातून लेखन करणारे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. हनुमंत नारायण जगताप यांचा जन्म. ‘गणित अध्यापन पध्दती’, ‘शैक्षणिक तंत्रज्ञान’, ‘नवविचार प्रवाह व प्रवर्तने’, ‘शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र’, ‘अध्ययन उपपत्ती व अध्यापन’, ‘प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान’, ‘शैक्षणिक मानसशास्त्र (सं)’, ‘शैक्षणिक मानसशास्त्र (डी. एड.साठी)’, ‘शैक्षणिक मूल्य मापन (डी.एड. साठी)’, ‘आशयुक्त अध्यापन’, ‘गणित आशयुक्त अध्यापन’ अशी साहित्य संपदा. **१९५८:-** सुप्रसिध्द कवी अरुण दिगंबर शेवते यांचा जन्म. ‘कावळ्यांची कविता’, ‘संदर्भ’, ‘सई मालवणकर’ हे काव्यसंग्रह व ‘राजघाट’ हे खंडकाव्य प्रसिध्द. **१९६७:-** मर्मज्ञ समीक्षक, काव्यचर्चा व साहित्य तोरण या नियतकालिकांचे संपादक आणि अर्वाचीन मराठी काव्याचे पुरस्कर्ते नारायण महादेव भिडे यांचे निधन. ‘केशवसुत यांची कविता’ ह्या अभ्यासपूर्ण लेखातून त्यांनी केशवसुतांच्या कवितांचे अंतरंगदृष्ट्या व काव्यदृष्ट्या विवेचन केले आहे. त्यांनी विपूल प्रमाणात लेखन केले. त्यापैकी ‘अर्वाचीन मराठी कवी व काव्ये’, ‘प्राचीन व अर्वाचीन कविता’, ‘काव्याची उत्क्रांती व त्यांचे भविष्यकालीन स्वरुप’ हे त्यांचे काही महत्त्वाचे लेख. त्यांच्या निवडक टिकालेखांचा संग्रह ‘काव्यदीपिका’ या नावाने प्रसिध्द. तसेच ङ्गप्रवासीफ हा गोल्ड स्मिथच्या ‘द ट्रॅव्हलर’ चा अनुवाद त्यांच्या नावावर आढळतो. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे भाचे ही एक त्यांची आणखी एक ओळख. **२००३:-** अभिजात व फिल्मी संगीत, विवेकानंद आणि गालिब अशा विषयांवर रसग्राही लेखन व एकपात्री कथन करणारे ‘फिरस्ता’ वसंत पोतदार यांचे निधन. पं.भीमसेन जोशी यांचे चरित्र ते आर. डी. बर्मन ही त्यांनी लिहिलेली अगदी अलिकडची पुस्तके. ‘अग्निपुत्र’, ‘फिरस्ता’, ‘योध्दा संन्याशी’, ‘मिर्झा गालिब’,‘एकोणीशे एक’,‘रामबाग टोळी’ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. ‘नाळ’ ला महाराष्ट्र साहित्यपरिषदेचा, तर ‘कुमार’ ला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० एप्रिल
१) श्री. अशोक मोरेश्वर परळकर
विद्यानगर, अलिबाग ३०-४-१९३९



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# माथेरानचे जंगलात सिमेंट पिशव्यांचा खच

## निसर्ग पर्यटन संस्थेचे पालिकेला निवेदन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान हे थंड हवेचे ठिकाण तेथील घनदाट जंगल आणि निसर्गसंपन्न वातावरण यामुळे प्रसिद्ध आहे. मात्र, त्याच जंगलात वनसंपदा कमी करण्यासाठी शासनाच्या योजना राबविणारे ठेकेदार आपले कष्ट कमी करण्यासाठी पळवाटा काढताना दिसत आहेत. तीन वर्षांपूर्वी माथेरानचे विविध भागात रस्त्यांची कामे करण्यासाठी आणलेल्या सिमेंट पिशव्या जंगलात फेकून देण्याचे प्रकार झाले होते. दरम्यान, पालिकेने संबंधित ठेकेदारांना रिकाम्या पिशव्या उचलण्याचे आदेश दिले होते. मात्र, आजही जंगलात हजारो पिशव्या अस्तव्यस्त पडून आहेत. या पिशव्या उचलण्याची कार्यवाही माथेरान पालिकेच्या वतीने ठेकेदारामार्फत व्हावी, अशी मागणी माथेरानमधील निसर्ग पर्यटन संस्थेने केली आहे.



माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी असलेले रस्ते क्ले पेव्हर ब्लॉकचे बनविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून निधी मिळाला होता. त्या निधीमधून क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यासाठी सिमेंटच्या रिकाम्या पिशवीमध्ये क्ले पेव्हर तसेच वाळू आणण्यात आली होती. लाखो पिशव्यांमधून साधारण वर्षभर दस्तुरी येथून मालवाहू घोड्यावरून क्ले पेव्हर आणले जात होते. मात्र, पिशव्यांमधून आणलेले क्ले पेव्हर उतरवल्यावर त्या सिमेंट पिशव्या एकत्रित गोळा करण्याची गरज होती. मात्र, ठेकेदाराने आपली कामे पूर्ण झाल्यावर मुंबई महानगर विकास प्राधिकरणकडून त्या पिशव्या उचलून पुन्हा दस्तुरी येथे नेल्या नाहीत. परिणामी, त्या रिकाम्या पिशव्या या अस्तवस्त होऊन जंगलात वाऱ्यासोबत कुठेही उडून गेल्या आणि तीन वर्षे जंगलात तशाच पडून आहेत.

दरम्यान, या पिशव्यांमुळे जंगलात नवीन झाडांची उगवण्याचे प्रमाण कमी झाले आहे.तसेच जंगलात मातीची पाणी साठवण्याची क्षमतादेखील कमी झाली आहे. हे लक्षात घेऊन माथेरान पालिकेला आतापर्यंत अनेकांनी त्या पिशव्या उचलून बाहेर काढण्यासाठी निवेदन दिले आहे. मात्र, पालिका मुख्याधिकारी त्यावर कोणतीही कार्यवाही करताना दिसत नाहीत.रस्त्यांच्या कामासाठी आणलेले क्ले पेव्हर यांच्यासाठी सिमेंट पिशव्या वापरण्यात आल्या होत्या, त्या पिशव्या संबंधित कामाच्या ठेकेदाराने उचलणे आवश्यक होते. मात्र, त्या उचलण्याची कार्यवाही व्हावी आणि संबंधित रस्त्यांच्या कामांचे ठेकेदार यांच्यावर पालिकेने दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी माथेरान निसर्ग पर्यटन संस्थेने केली आहे.

# शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत घर बेचिराख

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली वसाहतीमधील गुरुव्हिला सोसायटीतील बंद घरात शॉर्टसर्किटने आग लागून संपूर्ण घर बेचिराख झाले. घरात कोणी नसल्याने सुदैवाने जीवितहानी टळली. घरात दोन गॅसचे सिलिंडर होते. मात्र, शेजाऱ्यांनी वेळीच प्रसंगावधान राखून घराचा दरवाजा तोडून अग्निशमन दलाला पाचारण केल्याने अनर्थ टळला. कळंबोलीचे अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले.

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ४मध्ये असलेल्या गुरुव्हिला सोसायटीतील डी विंगमधील ३०३ क्र. सदनिका किशोर काना पाटील यांच्या मालकीची आहे. या घरात बिपिन सिंह हे भाड्याने राहात आहेत. सकाळी नेहमीप्रमाणे त्यांनी घरातील काम आटोपून बाजारहाट करण्यासाठी बाहेर गेले असता, घरात शॉर्टसर्किटमुळे आग लागली. घर बंद अवस्थेत असल्याने घरातूनच धुराचे लोट व आगीच्या ज्वाला बाहेर खिडकीतून येऊ लागल्या. प्रसंगावधान राखून शेजारी राहत असलेल्या हेमंत पिसे यांनी व अन्य दक्ष नागरिकांनी घराचा दरवाजा तोडून पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. सोसायटीचे सचिव उमाकांत गव्हाणे यांनी तात्काळ अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले व घरात प्रवेश करून गॅसचे दोन सिलिंडर बाहेर काढून ते निकामी केले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.

# बंद घराचा दरवाजा उघडून चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

अज्ञात चोरट्याने पनवेल येथील एमसीसीएच सोसायटीतील एका बंद घराचा दरवाजा उघडून हॉलमध्ये ठेवलेल्या मोबाईल आणि इअर बड्स चोरून नेल्याची घटना घडली.

प्रमोद चंदने असे मोबाईल चोरीला गेलेल्या व्यक्तीचे नाव आहे. चंदने हे एमसीसीएच सोसायटी, पनवेल येथे राहतात. रात्री उशिरापर्यंत काम केल्यानंतर त्यांनी त्यांचा किमती मोबाईल व इअर बड्स हॉलमध्ये असलेल्या चार्जिंग पॉइंटजवळ ठेवून ते हॉलमध्ये झोपले होते. दरम्यान, रात्रीत अज्ञात चोरट्याने ते चोरून नेले. सकाळी झोपेतून उठल्यानंतर ही बाब त्यांच्या लक्षात आली. त्यावर त्यांनी त्यांच्या घराच्या समोर असणाऱ्या जुईकर यांच्या घराच्या बाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले असता दोन महिला, त्यापैकी एका महिलेच्या कडेवर लहान बाळ व दुसऱ्या महिलेसोबत एक मुलगा असे घराच्या गेटमध्ये प्रवेश करत असताना दिसून आले. त्यामुळे अनोळखी महिला आणि मुलगा यांनी घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केल्याचे आढळले. त्यावर चंदने यांनी दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धरणाच्या पाण्यावर बहरली शेती

## शेतकऱ्यांकडून भाजीपाल्याची शेती; भाजीपाला पिकवून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुक्यातील वावेहवेली येथील शेतकरी बांधवांनी मोठ्या प्रमाणात कारली, भेंडी, मिरचीचे मळे फुलवले आहेत. वावे धरणाच्या पाझर तलावाच्या पाण्याच्या जोरावर गावातील तरुण शेतकरी बांधवांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेती केली आहे. त्याचबरोबर शासकीय कृषी अधिकाऱ्यांच्या मदतीने वेगवेगळ्या वाणांची निवड केलेली शेती आता बहरली असून, शेतकऱ्यांची मेहनत फळाला आल्याचे चित्र आहे.



या गावातील स्त्रिया, पुरुष मेहनती असून, फळभाज्या, पालेभाज्या विक्रीतून आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी धडपड करीत असतात. त्यामधून वर्षभरासाठी लागणारा पैसा यातून नक्कीच मिळवित असतात. वावे हवेलीला लाभलेल्या धरणामुळे येथील शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध झाले आहे. तालुक्यात कोणतेही कारखाने अथवा कंपन्या नसल्याने बहुतांश तरुणांनी शहराकडे नोकरीनिमित्त स्थलांतर केले आहे. मात्र, वावेहवेली येथील तरुणांनी धरणाच्या पाण्याचा पुरेपूर वापर करून शेतीतून रोजगारनिर्मिती केली आहे. उन्हाळी हंगामातदेखील धरणाच्या पाण्यावर मेथी, पालक, माठ, शेपू, काकडी, कोथिंबीर, मिरची यांसारखी अनेक भाज्यांचे उत्पादन घेतले जाते. ही पिके शेतकरी बांधवांना आर्थिक प्रगतीकडे नेणारी ठरत आहेत. अशी मेहनत करणारी शेतकरी पिढी दुसऱ्या पिढीलाही आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत नाविन्यपूर्ण शेती करण्यात नक्कीच नवी दिशा देतील, यात शंका नाही.

> **उन्हाळी भाजीपाला लागवड करून त्यामध्ये भेंडी, वांगी, मिरची, टोमॅटो अशी पिके घेऊन तळा बाजारपेठेत याची विक्री होते. माठ, मुळा, मिरची, कोथिंबीर, काकडी ही पिके अगदी थोड्या दिवसात अधिक उत्पन्न देणारी असतात. यातून पैसाही हातात खेळता राहतो.**

> **वावे धरणाच्या पाण्यावर शेतीत वेगवेगळ्या प्रकारच्या वाणांचे बाजारोपण करीत कृषी अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने कीटकनाशक फवारणी, खते देऊन विविध भाज्यांची पिके घेत असतो व यातूनच कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवितो.**
> **– गजानन पारावे, शेतकरी**

# ट्रकच्या चार बॅटऱ्यांसह इतर सामनाची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

गॅरेजमध्ये प्रवेश करून अज्ञात चोरट्यांनी गॅरेजशेजारी असलेल्या ट्रकच्या चार बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

अब्दुल खान याचे रोडपाली, कळंबोली येथे नॅशनल ऑटो इलेक्ट्रिशन नावाचे गॅरेज आहे. त्याच्या गॅरेजमध्ये प्रवेश करून चोरट्यांनी ट्रेलरचे मोटर स्टार्टर, लोडिंग बॅटरीसाठी लागणारी वायर चोरून नेली. तसेच गॅरेजशेजारी उभ्या असलेल्या दोन ट्रकच्या चार बॅटऱ्या चोरून नेल्या. याप्रकरणी अज्ञात चोरांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# कोलाड येथे तरुणाचा मृत्यू

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई- गोवा महामार्गावरील कोलाड कोकण रेल्वे पुलावरुन दारू पिऊन तोल गेल्याने पुलाच्या खाली पडून तरुणाचा दुर्दैवी अंत झाला असल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, दि.२७ एप्रिल रोजी २.५३ वा संत रोहिदासनगर कोलाड येथील अभिषेक रवींद्र जानवरकर (३०) यांनी कोकण रेल्वे पुलावर दारू प्यायला असता त्याचा दारूच्या नशेत तोल जाऊन तो पुलाच्या खाली असलेल्या खडी व दगडावर आपटला. त्याच्या कपाळाला व नाकातोंडावाटे रक्त येऊन गंभीर स्वरूपाची दुखापत होऊन मयत झाला आहे.

# विनारॉयल्टी गौण खनिजाची वाहतूक

## डंपर चालकाविरोधात गुन्हा दाखल

**। पनवेल । वार्ताहर ।**

शासनाची रॉयल्टी न भरता गौण खनिज भरून वाहतूक केल्याप्रकरणी डंपर चालकाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी यांना मिळालेल्या माहितीवरून ओवेगाव ते पापडीचा पाडा रोडवरील खुटूक बांधण गाव कमानीदरम्यान त्यांच्या पथकाने एक डंपर अडवून त्याची तपासणी केली. त्यानुसार त्यात सहा ब्रास गौण खनिज खडी भरलेली मिळून आली. याबाबत डंपर चालकाला रॉयल्टी पावतीबाबत विचारणा केली असता त्याने शासनाला रॉयल्टी भरली नसल्याचे सांगितले. यावेळी डंपर चालकाला डंपर पुढील कार्यवाहीकरिता तहसीलदार कार्यालय पनवेल येथे नेण्यास सांगण्यात आले. मात्र, डंपर चालक डंपर सुरू करून तिथून निघून गेला.

# नालेसफाईच्या कामाला मुहूर्त कधी?

## नेरळमधील नागरिकांचा सवाल

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ शहरात अनेक ओढे, नाले असून, सध्या ते कचऱ्याने बुजले असल्याचे चित्र आहे. त्यातही चिकन, मच्छी आदी कचरादेखील याच नाल्यात पडत असल्याने येथील रहिवासी यासह वाहनचालक याना नाक मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या नाल्या, ओढ्यांची सफाई होणार तरी केव्हा असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे.



पावसाळ्याची चाहूल लागण्याअगोदर स्थनिक प्रशासनाकडून नालेसफाईला सुरुवात केली जाते. जेणेकरून या नाल्यात कचऱ्यामुळे पाणी अडून रहिवासी क्षेत्रात ते शिरू नये यासाठी ही खबरदारी घेतली जाते. असे असताना नेरळ शहरात असलेल्या मोहचीवाडी, वाल्मिकीनगर भागात कर्जत कल्याण राज्यमार्गावर दोन पूल आहेत. या पुलाखालून जाणाऱ्या ओढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. अनेक दिवस साचून कुजलेल्या या कचऱ्यामुळे येथून जाणाऱ्या नेरळकर व वाहनचालकांचे नाक आपोआपच मुठीत येते. त्यामुळे हे नाले-ओढे नेरळ ग्रामपंचायतीने तात्काळ स्वच्छ करावेत, अशी ओरड नागरिकांमधून होत आहे.

> **नालेसफाई नेरळ ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात येते. पुढील १५ दिवसांत सर्व नालेसफाई करण्यात येईल.**
> **– अरुण कारले, ग्रामसेवक, नेरळ ग्रामपंचायत**

# मोबाईल खेचून चोरटा फरार

**पनवेल :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशाच्या हातावर फटका मारून अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल लांबवल्याची घटना घडली. अजित गोवलकर असे या प्रवाशाचे नाव आहे. ते साखळोली येथे येण्यासाठी दिवा-रत्नागिरी पॅसेंजर गाडीने प्रवास करत होते. पनवेल रेल्वे स्टेशनवरून सुरू झाल्यावर ते डब्याच्या दरवाजाजवळ मोबाईल हातात घेऊन बसले होते.

## लोकशाही वाचवण्यासाठी लढा

करणाऱ्यांना मारण्याचे काम करीत आहेत. एकही विरोधक ठेवत नाहीत, अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. तीच परिस्थिती आपल्याही देशात सुरु आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये भय निर्माण करण्याचे काम केले जात आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान दिले. लोकशाहीचे राज्य दिले. सर्वसामान्य जनतेला त्यांचा हक्क मिळवून दिला. मात्र, ही लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकशाही वाचविण्यासाठी प्रत्येकाने मनाचा निर्धार करून निवडून द्या, असे आवाहन अनंत गीते यांनी केले. महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ रामराज येथे इंडिया आघाडीच्या वतीने जाहीर सभा सोमवारी (दि. २९) घेण्यात आली. यावेळी गीते बोलत होते.

यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आ. संजय पोतनीस, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, काँग्रेस जिल्हा महिला अध्यक्षा ॲड. श्रद्धा ठाकूर, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेस जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर, शेकापचे युवा नेते सवाई पाटील, मराठी मुस्लीम अध्यक्ष सुभान अली खान, सर्वहारा आंदोलन संघटनेच्या प्रमुख उल्का महाजन, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, सभासद, रामराज पंचक्रोशीत असंख्य कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या. याप्रसंगी मार्गदर्शन करताना अनंत गीते म्हणाले, तटकरेंनी माझ्यावर अनेक आरोप केले आहेत. या जिल्ह्यात काय विकासकामे केली आहेत, असा सवाल उपस्थित केला आहे. मात्र, तटकरेंना उत्तर देण्यास बांधील नाही. येड्या गबाळ्यांना उत्तर देण्याची आवश्यकता वाटत नाही. माझी बांधिलकी येथील जनतेशी आहे. गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी वर्गासोबत आहे. रामराज या ठिकाणी जी सभा होत आहे, त्या सभेची शेड माझ्या कारकीर्दीत बांधली आहे, याची जाणीव तटकरेंना असावी, असा टोला गीतेंनी लगावला.

गीते पुढे म्हणाले की, बॅ. अंतुले यांनी सुनील तटकरे यांना राजकीय जन्म दिला. मात्र, त्यांच्याच पाठीत राजकीय खंजीर खुपसण्याचे काम तटकरेंनी केले आहे. ज्यांनी तटकरेंना मदत केली, त्यांच्याशीच तटकरेंनी गद्दारी केली आहे. निर्ढावलेल्या तटकरेंना येत्या सात मे रोजी होणाऱ्या मतदानातून जागा दाखवा. ही लढाई एक वेगळ्या विचारांची आहे. धनशक्ती विरूद्ध श्रमशक्ती अशी या निवडणुकीत लढाई असणार आहे. त्यामुळे धनशक्तीला हद्दपार करण्याचा निर्धार प्रत्येकाने केला पाहिजे. मोदी सरकारने वेगवेगळ्या घोषणा केल्या. वेगवेगळ्या जाहिराती केल्या. मात्र, या सर्व घोषणा व जाहिराती फसव्या आहेत. त्याचे भान प्रत्येकाने राखले पाहिजे. उज्वल योजनेच्या माध्यमातून गॅस आणला, मात्र सिलिंडरच्या किमती भरमसाठ वाढविल्याने आज चुलीवर जेवण बनविण्याची वेळ अनेक महिलांवर आली आहे. या दहा वर्षांत मोदींनी सर्वसामान्य जनतेला फसविण्याचे काम केले आहे.

**फितुरांचा कडेलोट करायचाय : सुभान अली खान**

देशात २०१४ पासून भाजपचे सरकार आले. शेतकरी, गोरगरीबांचे हित साधण्याऐवजी त्यांच्याविरोधात धोरणे राबवली. शेतकऱ्यांनी त्याविरोधात आंदोलन केले. त्यावेळी दिल्लीत भाजप सरकारने शेतकऱ्यांना मारले. बळीराजाचा हत्यारा भाजप आहे. या निवडणुकीत फितुरांचा कडेकोट करा आणि महाराजांच्या विचारांचा आणि महाराष्ट्राच्या कल्याणासाठी अनंत गीते यांना निवडून द्या, असे आवाहन मुस्लीम मराठी अध्यक्ष सुभान अली खान यांनी केले.

पान १ वरुन

**गीतेंना निवडून द्या : राजाभाऊ ठाकूर**

शेतकऱ्यांविरोधात कायदे तयार केले. त्याविरोधात लढणाऱ्या शेतकऱ्यांना मारण्याचे काम भाजप सरकारने केले. अनेक शेतकरी मृत्युमुखी पडले. तसेच नोटाबंदीच्या नावाने सर्वसामान्यांवर झालेला अन्याय न विसरण्यासारखा आहे. या निवडणुकीत अनंत गीतेंना निवडून द्या, असे आवाहन काँग्रेसचे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांनी केले.

**बदल निश्चित होणार : उल्का महाजन**

रायगड लोकसभा निवडणुकीनिमित्त होत असलेल्या सभा, बैठका व प्रचारांमधून अनंत गीते यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. यावरून बदल निश्चित होणार आहे. हा बदल दणाणून सोडणारा आहे. ही निवडणूक लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी आहे. त्यामुळे अनंत गीते यांना बहुमतांनी निवडून द्या, असे आवाहन सर्वहारा आंदोलनाच्या प्रमुख उल्का महाजन यांनी केले.

## ही लढाई हुकूमशाहीविरोधात

**शिवाजी महाराजांचे विचार जपणारे उद्धव ठाकरे, अनंत गीते या दिल्लीसमोर झुकले नाही. कोरोना काळात मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी निष्ठेने काम केले, असेही त्या म्हणाल्या. अलिबाग-रोहा रस्ता एका दिवसात करतो, अशा बाता मारणाऱ्या गद्दार आमदारांनी जनतेला फसवले. सुनील तटकरे आणि दळवी यांनी मोठा गाजावाजा करत उमटे धरणाचे गाळ काढण्याचा दिखावा केला. पण गाळ काढला नाही, असेही त्यांनी सांगितले. त्या पुढे म्हणाल्या की, माझ्या महिलांना शुद्ध मिळावे यासाठी ही लढाई आहे. त्यामुळे अनंत गीते यांना बहुमतांनी निवडून द्या. ज्यांना मागील लोकसभा निवडणुकीत निवडून दिले, त्या तटकरेंना पाडण्यासाठी सज्ज व्हा. आपली फसवणूक केली. त्याचा बदला घेण्याची मनात चीड निर्माण करून तटकरेंना हद्दपार करा, असे आवाहनही त्यांनी जनतेला केले. शेतकरी कामगार पक्ष काय करू शकतो हे दाखवून द्यायचे आहे. ही लढाई शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार विरुद्ध पैसा अशी असणार आहे, असेही त्या म्हणाल्या.**

## प्रसूतीसाठी पैशांची मागणी

घातली. त्यानंतर सरताज खान यांनी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय म्हसकर यांच्याकडे लेखी तक्रारदेखील केली आहे.

परंतु रुग्णलयात वैद्यकीय अधीक्षक डॉ मस्कर यांच्याकडून डॉ. मोरे यांच्यावर कारवाई केली नाही. दुसरीकडे वैद्यकीय अधीक्षक यांच्याकडून रुग्णालय परिसरात आणि अंतर्गत भागाची पाहणी केली जात नाही, असा आरोप रुग्णांचे नातेवाईक करीत आहेत. अक्षम्य दुर्लक्षामुळे उपजिल्हा रुग्णालय परिसरात तसेच रुग्णांच्या वॉर्डमध्ये भरमसाठ घाणीचे साम्राज्य पसरले असून, महिला व पुरुष रुग्णांसाठी असलेल्या शौचालयांची बिकट अवस्था झाली आहे. महिला रुग्णांच्या शौचालयाचे दरवाजे अर्धवट तुटलेले असल्यामुळे महिला रुग्णांची कुचंबणा होत आहे. परंतु, उघड्या डोळ्यांनी उपजिल्हा रुग्णालयाची होत असलेली दुरवस्था वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय म्हसकर यांना दिसत नाही का? उपजिल्हा रुग्णालयात सर्व सामान्य गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार मिळायला हवे असतानाही अशाप्रकारे पैशांची मागणी केली जाते, यावर वैद्यकीय अधीक्षक मूग गिळून गप्प का आहेत? अशा उलटसुलट चर्चा शहरात तसेच सोशल मीडियावर सुरू आहेत.

## मजगावमध्ये शिंदे गटाला दणका

अखेर शिंदे गटाच्या मनमानी कारभाराला कंटाळून शेकापचे आशिष देशपांडे यांच्या पुढाकाराने मजगावमधील असंख्य मुस्लीम कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. आ. जयंत पाटील यांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे लाल मफलर देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी या नवनिर्वाचित कार्यकर्त्यांनी शेकापला पाठिंबा देत या निवडणुकीत प्रचंड मेहनत घेऊ, असे आश्वासन दिले. ऐन निवडणुकीत शिंदे गटातील अनेक कार्यकर्ते शेकापमध्ये सहभागी झाल्याने शिंदे गटाला दणका मिळाल्याचे चित्र आहे.

## नात्याला काळीमा!

ती आपल्या पतीसोबत राहात असताना आरोपी काकाने ते फोटो व व्हिडीओ तिच्या पतीला पाठवून तिची बदनामी केली. या प्रकारानंतर पीडित तरुणीने काकाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## अखेर आरसीएफ प्रशासन नरमले

असलेल्या आरसीएफ थळ प्रशासनाच्या मनमानी कारभाराची सत्यता आज समोर आली असून, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांनी आपली बाजू मांडताना स्पष्ट सांगितले आहे की, नवीन प्रवेश व वर्ग बंद करण्याचा सर्वस्वी निर्णय हा आरसीएफ थळ प्रशासनाचा होता आणि असा कोणताही निर्णय आमच्या सोसायटीने घेतलेला नाही. मागील दहा-बारा दिवसांपासून चालू असलेल्या चौकशी पडताळणीनंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टेवाड यांनी आरसीएफ शाळेची सन २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रिया डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या समन्वयाने पूर्ववत सुरू करण्याबाबत आरसीएफ थळ प्रशासनाला कळविले आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, सर्व पालक, शिक्षक, पत्रकारांनी केलेल्या सहकार्याबद्दल धनंजय म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

## तटकरेंनाजनताच घरी बसवणार

राजकारणात वेगळा दबदबा आहे. मागील लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना शेतकरी कामगार पक्षाने निवडून दिले आहे. त्यामुळे ते दिल्लीला गेले. गेल्या पाच वर्षांत पनवेल-इंदापूर रस्ता झाला नाही. प्रकल्प कागदावर राहिले आहेत. फक्त तटकरेंनी घोषणा करण्याचे काम केले आहे, अशी टीका पंडित पाटील यांनी केली.

## ...चित्रलेखा पाटील आक्रमक

मुबलक राहावा यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही देत पाणीप्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन बास्टेवाड यांनी दिले.

जर सरकारी यंत्रणेकडून त्वरित गाळ काढण्याचे काम होत नसेल, तर आम्ही स्वतः जातीने लक्ष देऊन सामाजिक बांधीलकीतून उमटे धरणाचा गाळ काढण्यास पुढाकार घेऊ, त्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी, अशी चित्रलेखा पाटील यांनी मागणी केली आहे.

## गळफास घेतलेल्या स्थितीत मृतदेह

असल्याने घटनास्थळीच मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जगदीश गायकवाड हे करीत आहेत.

# वीस वर्षांनंतरही कुंभे प्रकल्पग्रस्त वाऱ्यावर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील कुंभे जलविद्युत प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे अर्धवट स्थितीत पुनर्वसन झाल्याने प्रकल्पग्रस्तात प्रचंड आक्रोश आहे. या बाधित शेतकऱ्यांच्या अनेक समस्या असून, यासाठी त्यांनी शासन दरबारी वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. मात्र, त्यांच्या या गंभीर समस्येकडे शासनाने डोळेझाकच चालवली असून, पुनर्वसनातील अनेक कामे ठप्प व प्रलंबित आहेत.

या पुनर्वसनासाठी प्रकल्पग्रस्थानी २० वर्षे शासन दरबारी खेटे मारून चपला झिजविल्या, मात्र त्यांना अद्यापही नागरी सुविधा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या पदरी निराशा पसरली आहे. शासनाचे धोरण 'आधी पुनर्वसन मग धरण' हे असून, शासनाच्या पुनर्वसन कायद्याची व्याख्याच शासनकर्ते पायदळी तुडवत आहेत. त्यामुळे २० वर्षांनंतरही कुंभे प्रकल्पग्रस्त वाऱ्यावर आहेत. पुनर्वसनाचे अर्धवट काम झाल्याने फक्त चार कुटुंबं भादाव पुनर्वसन जागेवर कसेबसे राहात आहेत.

जमिनीही गेल्या आणि पुनर्वसनही अर्धवट या कात्रित बाधित शेतकरी अडकला आहे. भादाव पुनर्वसित गावालगत केलेल्या सर्वे नं. ६४/० मधील पुनर्वसनाच्या विविध समस्या आजही प्रकल्पग्रस्तांना भेडसावत आहेत. कुंभे जलविद्युत प्रकल्पामुळे २०५ कुटुंबे बाधित होत असून, त्यांचे योग्य पुनर्वसन होणे आवश्यक आहे. या प्रकल्पग्रस्तांनी यापूर्वी झालेल्या बैठकीत आपल्या विविध समस्या पुनर्वसन अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. बाधित होणाऱ्या २०५ कुटुंबांपैकी १२० कुटुंबांचे कुंभे धरणाजवळच सर्वे नं. ६३/१ येथे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या कामाची सुरुवात २००७ मध्ये झालेली आहे. त्यापैकी ८५ बाधित कुटुंबांचे पुनर्वसन भादाव महसूल गावातील सर्वे नं. ६४/० येथे होत आहे. या कामास २०११ मध्ये सुरुवात झालेली असून, सात वर्षांत प्रकल्पग्रस्तांना शासनाने देऊ केलेल्या नागरी सोयी सुविधा अद्यापही पुरविल्या गेल्या नाहीत. यापैकी अनेक कामे अपूर्ण आहेत. तर काही कामे अनेक दिवसांपासून ठप्पच आहेत.

२००६ मध्ये कुंभे गावातील व परिसरातील जमीन व घराखालील जागा शासनाने प्रकल्पासाठी घेऊन त्यांना त्यावेळी अत्यल्प मोबदला देऊन पुनर्वसनाचे गाजर दाखवत या जमिनी काढून घेतल्या. तेथे जलविद्युत प्रकल्पाचे कामही सुरु झाले. त्यामुळे बाधित कुटुंबे स्थलांतरीत झाली. काही बाधित कुटुंबांना कुंभे जलविद्युत प्रकल्पाजवळच पुनर्वसन करण्याचे नियोजन केले. तर, काही बाधित कुटुंबांनी माणगावजवळील भादाव गावाजवळ पुनर्वसनाची मागणी केली. त्या प्रमाणे पुनर्वसनाचे काम अर्धवट केले. मंजुरी आराखड्यात बसस्थानक, निवाराशेडचे काम असताना ते काम अद्यापही हाती घेतलेले नाही. त्याचबरोबर स्मशानभूमीची जमीन संपादनाची प्रक्रिया अद्याप केलेली नाही. नळ पाणी पुरवठा योजना दिली मात्र कायम स्वरूपी पाणी नसल्यामुळे बाधितांचे हाल होत आहेत.

**निवडक**

## तळा बाजारपेठ गजबजली

**तळा** : सध्या सर्वत्र सुरू असलेल्या लग्न सराईमुळे शहरातील चाकरमानी मोठ्या प्रमाणावर आपल्या गावी दाखल झाले आहेत. या चाकरमान्यांमुळे तळा बाजारपेठ गजबजली असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंतच विवाह मुहूर्त असल्याने गावागावांत मोठ्या प्रमाणावर लग्न सोहळे पार पाडले जात आहेत. तसेच, हल्ली बंदिस्त हॉलमध्ये लग्न करण्यापेक्षा गावीच मोकळ्या जागेत आलिशान मंडप सजावट करून थाटामाटात लग्न करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे.

## तुकाराम यांचा सेवापूर्ती सोहळा

**चिरनेर** : रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे येथे चार सेवकांचा सेवापूर्ती सोहळा शुक्रवारी (दि.२६) पार पडला. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक संतोष म्हात्रे, कार्यालय प्रमुख एम.पी. तुंबडे, जुनियर कॉलेजच्या प्राध्यापिका ज्योती कपडेकर, भांडारपाल सुरेखा घरत या सेवकांचा सेवापूर्ती सोहळा विद्यालयाच्यावतीने साजरा करण्यात आला. यावेळी कृष्णाजी कडू, एम.जी. म्हात्रे, यशवंत ठाकूर, मीनाक्षी म्हात्रे, सर्व सेवक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

## तेरा वर्षीय मुलगी बेपत्ता

**खोपोली** : पटेलनगर-कातकरवाडी येथे राहणारी १३ वर्षीय नंदीनी राकेश यादव ही मुलगी बेपत्ता झालेली आहे. तिच्या अंगात नेसूस निळ्या रंगाचा शाळेचा युनिफॉर्म आहे. खोपोली पोलीस ठाण्यात हरवली असल्याची नोंद दाखल करण्यात आली आहे. कोणाला या मुलीबद्दल माहिती असल्यास खोपोली पोलीस ठाणे ०२१९२-२६३३३३ किंवा तपासिक अंमलदार पोलीस पोलिस उपनिरीक्षक अलोक खिसम तराव ९९६७९७९७०० या नंबरवर संपर्क साधून कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विशेष स्वच्छता मोहिम

**खोपोली** : नगर परिषदेअंतर्गत स्वच्छता मोहिमेचे विशेष आयोजन करण्यात आले होते. यामुळे तरी शंभर टक्के मतदानाबाबत जनजागृती करण्याचे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी केले. वरची खोपोली प्रभाग ते मुंबई-पुणे महामार्गावरील हनुमान मंदिर मुळगाव या दरम्यानच्या भागात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात स्वच्छतेची शपथ मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी उपस्थित अधिकारी वर्ग व कर्मचाऱ्यांना दिली.

## नवीन इमारतीचे उद्‌घाटन

**कर्जत** : सेवा सहयोग फाऊंडेशन विद्यार्थी विकास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या अभिनव ज्ञान मंदिर संस्थेच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लीना देवस्थळी, रवींद्र कर्वे, गणेश वैद्य, श्रीराम पुरोहित, अरुण धारप, नंदकुमार मणेर, पद्माकर गांगल, ठशरद गांगल आदी उपस्थित होते. यावेळी वास्तू विशारद ब्रीद जगताप, ठेकेदार रामभाऊ वाघमारे आणि इमारतीचे काम चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी लक्ष ठेवणारे सुहास थावरे यांचा संस्थेच्यावतीने सन्मान करण्यात आला.

# फणसाड अभयारण्यात पर्यटन बहरणार

## पर्यटकांसाठी विशेष सोयी-सुविधा

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुंबईपासून १५४ किमी अंतरावर पनवेल-मुरूड मार्गावर ५२ चौरस कि.मी. क्षेत्रावर विस्तारलेल्या फणसाड अभयारण्याला जणु निसर्गाचा वरदहस्तच लाभलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात फणसाड अभयारण्याचे क्षेत्र मुरुड-जंजिरा संस्थानाचे नवाब सिद्दी यांचे राखीव शिकार क्षेत्र होते. येथील जैवविविधतेचे संरक्षण व्हावे या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९८६ साली फणसाड वन्यजीव अभयारण्य घोषित केले. भारतातून हजारो पर्यटक फणसाडला भेट देत असतात. खासकरून पावसाळी वातावरण अतिशय सुंदर असते. येथे घनदाट झाडी असल्याने पावसाचे प्रमाण खूप आहे आणि हे ठिकाण उंचावर असल्याने उन्हाळ्यात देखील थंड वातावरण असते. तसेच, येथील शेकडो पाणवठे पावसाच्या पाण्याने भरतात.



पावसाळ्यात फणसाड धरण पुर्णपणे भरून त्याच्या वाहून जाणाऱ्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक भोईघर येथे येत असतात. भोईघर गावातून फणसाड धरण १० मिनिटांवर असल्याने गावाला पर्यटन व्यवसाय मिळतो. अभयारण्यातील नदीकाठी वैविध्यपूर्ण जंगलात सुमारे ७१८ प्रकारचे वृक्ष, १७ प्रकारचे सस्तन प्राणी, १६४ प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी, २७ प्रकारचे साप व अनेक वन्य श्वापदे आढळतात. पश्चिम घाटांतर्गत येणाऱ्या या भूप्रदेशाचे उष्णकटीबंधीय हवामान असून तापमान किमान २५ ते कमाल ३५ अंश सेल्सीयस इतके असते.

अभयारण्यात भटकंतीसाठी विशेष वाटा (ट्रेल) तयार करण्यात आल्या आहेत. त्यात फणसाडगाण, धरणाधीमान, चिखलगाण, सावर तलाव सुपेगाव देवराई यांचा समावेश आहे. गाण म्हणजे पाण्याची जागा. फणसाड वन्यजीव अभयारण्यात तब्बल २७ पाणस्थळे आहेत. यातील चिखलगाण पाणस्थळावर अनेक पक्षी, प्राणी येत असतात. त्यांचे जवळून निरीक्षण करता यावे यासाठी एक खास लघुगृह बांधण्यात आले आहे. तसेच, पुण्याचा माळ, चाकाचा माळ, दांडा, गाडग्याचा माळ या ठिकाणी निरीक्षणासाठी उंच मनोरे उभारण्यात आले आहेत. यातून दिसणारे दृष्य मनमोहून टाकणारे असते. येथील खास शिकारीसाठी नवाबाने जागोजागी बांधलेल जांभा दगडातील आडोसे आजही पाहायला मिळतात. पर्यटकांच्या सुविधेसाठी वन खात्याकडुन बांबु व सुपारीची घरे बांधण्यात आली आहेत. तसेच, वेळप्रसंगी तंबूमध्ये राहण्याची सोय केली जाते. त्यामुळे पर्यटकांमध्ये आणखी वाढ होताना दिसत आहे. या ठिकाणी ठराविक प्राणी-पक्षी हमखास दर्शन देतात. तसेच, पर्यटकांना वनभोजनाचा आनंद गावातील महिला बचत गट देत असतात.

### अभयारण्यातील वनसंपदा

***फणसाड अभयारण्यात साग व निलगिरीची रोपवने यासह प्रामुख्याने ऐन, किंजळ, जांभूळ, ढ्रेद, कुडा, गेळा, अंजनी, कांचन, सावर, अर्जुन हे वृक्ष व कर्करोगावर गुणकारक नरक्या याबरोबरच सीताअशोक, सर्पगंधा, कुरडु, रानतुळस, कढीपत्ता उक्षी या औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात आढळून येतात. वाकेरी, वाघाटी, पळसवेल, पेंटगुळ इत्यादी प्रकारच्या वेली व जगातील सर्वात लांब वेलींपैकी एक असलेली गारंबी.***

### अभयारण्यातील वन्यजीव

***फणसाड अभयारण्यात १७ प्रकारचे वन्यप्राणी आहेत. यामध्ये रानससा, सांबर, भेकर, पिसोरी, सांळींदर, तरस, रानडुक्कर, मुंगूस, कोल्हा, वानर, माकड, रानमांजर व बिबट्या आणि पर्यटकांच्या व अभ्यासकांचे आकर्षण असलेले शेकरू येथे हमखास दृष्टीस पडते.***




## नळपाणी योजनेचे पाणी तळाशी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ओलमण ग्रामपंचायतीमधील बोरगाव नळपाणी योजनेचे उद्‌घाटन दोन महिन्यांपूर्वी झाले आहे. दोन महिने भरघोस पाणी पुरवठा करणाऱ्या नळपाणी योजनेच्या उद्भव विहिरीने ऐन उन्हाळ्यात तळ गाठला आहे. त्यामुळे पिण्याचे पाणी सर्व ग्रामस्थांना मिळावे यासाठी दर दिवसाआड पाणी पुरविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, उद्भव विहिरीमध्ये मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी तेथील नदीमध्ये साठवण बंधारा बांधला असून त्याची उंची वाढविण्याची किंवा नवीन साठवण बंधारा बांधण्याची आवश्यकता असल्याची मागणी नागरीकांमधून होत आहे.

हर घर जल देण्यासाठी जलजीवन मिशनमधून ओलमण ग्रामपंचायतमधील बोरगाव, उंबरखांड आणि भवानी पाडा या भागासाठी नळपाणी योजना राबविण्यात आली. बोरगाव येथील पोश्री नदीच्या तीरावर उद्भव विहीर बांधून तेथे गोळा होणारे पाणी बोरगाव आणि उंबरखांड येथील जलकुंभमध्ये सोडण्यात येते. त्यानंतर घरोघरी असलेल्या नळाला सोडले जाते. मात्र, आता पोश्री नदी कोरडी झाली असून त्या कोरड्या झालेल्या नदीवर उद्भव असलेली विहिरीने देखील तळ गाठला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. काही ठिकाणी ग्रामस्थांच्या खासगी बोअरवेल आहेत, त्यामुळे गावात तीव्र पाणीटंचाई जाणवत नाही.

# महाड बाजारपेठेत वाहतूक कोंडी

## दुकानदार गाळे सोडून रस्त्यावर; नागरिक हैराण

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड बाजारपेठ ही जिल्ह्यातील सर्वाधिक मोठी बाजारपेठ असली तरी योग्य नियोजनाअभावी बाजारपेठेत होणाऱ्या वाहतूक कोंडीने स्थानिक नागरिक आणि पर्यटक हैराण झाले आहेत. शहरात असलेले दुकानदार, भाजी विक्रेते, फळ विक्रेते त्यांचा माल समोरील नाल्यावर आणि त्याच्याही पुढे रस्त्यावर आणून ठेवत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी होउन पादचाऱ्यांना त्रास होत आहे. याबाबत कायम तक्रारी करून देखील पालिका आणि पोलीस प्रशासन थातूरमातूर कारवाई करून सोडून देत आहेत.



दुकानदार आणि कर्मचाऱ्यांमधील आर्थिक हितसंबंध असल्याने कारवाई होत नाही, अशी चर्चा नागरीकांमध्ये सुरु आहे.

महाड बाजारपेठेत तालुक्यासह पोलादपूर, माणगाव, मंडणगड, म्हसळा आणि गोरेगाव येथून नागरिक खरेदीसाठी येत असतात. शिवाय महाड हे ऐतिहासिक शहर असल्याने याठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातून पर्यटक, शिवप्रेमी, भीमसैनिक दाखल होत असतात. गेली अनेक वर्षात शहराचा विस्तार देखील वाढू लागल्याने लोकसंख्येत वाढ झाली आहे. लोकसंख्या आणि बाजारपेठेतील गर्दी पाहता मुख्य बाजारपेठ रुंदीकरण झालेले नाही. यामुळे मुख्य बाजारपेठेत अवजड वाहन शिरताच अन्य वाहनांना अडथला निर्माण होउन वाहतूक कोंडी होत आहे.

मुख्य बाजारपेठेतील रस्त्याचे रुंदीकरण नगर रचना आणि विकास यामधील नियमात बसवला गेलेला नाही. यामुळे बाजारपेठ अरुंदच राहिली आहे. मुख्य बाजारपेठ आणि अन्य जोड मार्गांवर रत्यालगत बसलेले शेतकरी, छोटे भाजी विक्रेते यांच्याकडून दुकानदार पायरीवर बसण्याचे पैसे मोजतात असे सांगण्यात येते. यामुळे पालिका देखील ठराविक रकमेची पावती बनवून पैसे वसुल करण्याचे काम करत आहेत.

## उषा राजे यांचे निधन

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

रोहा येथील माजी नगराध्यक्ष डॉ. रमेश राजे यांची पत्नी डॉ. उषा राजे यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. सध्या त्यांचे वात्सव्य पुणे येथे असल्याने अंत्यविधी पुणे येथे करण्यात आला. अत्यंत मनमिळावू स्वभावाने येणाऱ्या पेशंटला आपुलकीने चौकशी करून त्यांना बरे करण्यात डॉ. उषा राजे यांचा हातखंड होता. त्यांच्या निधनाची बातमी समजतात रोहा, अलिबाग तसेच अन्य शहरातील त्यांच्या चाहता वर्गाने दुःख व्यक्त केले.



## कुपोषित बालकांची तपासणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात कुपोषित बालकांची संख्या मोठ्याप्रमाणावर आहे. कुपोषित बालकांना कुपोषणाच्या रेषेतून बाहेर काढण्यासाठी तालुक्यातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. उपेंद्र सुगवेकर यांच्याकडून तीव्र कुपोषित आणि अतितीव्र कुपोषित बालकांची तपासणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील तब्बल १२५ कुपोषित बालकांची तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली.

नेरळ येथील रहिवाशी आणि मुंबईमधील मोठ्या रुग्णालयात बालरोग तज्ञ म्हणून सेवा देणारे डॉ. उपेंद्र सुगवेकर हे कर्जत तालुक्यातील सर्व कुपोषित बालकांची दरवर्षी तपासणी आणि औषिधोपचार करीत असतात.



तालुक्यातील कुपोषित बालकांची संख्या वाढल्याचे लक्षात घेउन डॉ. नितीन गुरव यांच्या अवाहनानंतर तालुक्यातील सर्व कुपोषित बालकांची आरोग्य तपासणी नेरळ येथील रुग्णालयात करण्यात आली. त्यासाठी प्राथमिक आरोग्यातील कुपोषित बालकांना तपासणीसाठी नेरळ येथे आणण्यात आले होते.

## नांदगावात नाटकाचे आयोजन

**मुरूड-जंजिरा** : ग्रामस्थ मंडळ नांदगाव तर्फे १ मे महाराष्ट्र दिनाच्यानिमित्ताने महापूजेचे आयोजन करण्यात आले असून या पूजेनिमित्त 'कुर्रर्रर्र' या मराठी नाटकाचा प्रयोग होणार आहे. या नाटकाचे लेखक व दिग्दर्शक प्रसाद खांडेकर असून नाटकात प्रसिद्ध सिनेनाट्य तथा दूरदर्शन मालिकेतील हास्य जत्रा व अन्य मालिकांतील हास्य अभिनेते पॅडी कांबळे, प्रियदर्शन जाधव प्रसिद्ध सिनेनाट्य व दूरदर्शन अभिनेत्री विशाखा सुभेदार, मधुरा रानडे आदि कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. बुधवार बाजाराच्या भव्य पटांगणात बुधवारी रात्री ९.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

## उरण तालुक्यात शनी महाराज प्राणप्रतिष्ठापना

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील नवघर गावातील माजी सरपंच शेखर तांडेल यांच्यावतीने नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरात शुक्रवारी (दि.२६) श्री शनी महाराजांची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

सलग तीन दिवस चालणाऱ्या या मंगलमय सोहळ्यासाठी उरण तालुक्यासह नवघर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत राहून या सोहळ्याचे शाक्षीदार होत या भक्तीमय सोहळ्यात तल्लीन होऊन श्रवण सुखाचा आनंद लुटला. उरण तालुक्यात भव्यदिव्य श्री शनी महाराजांची प्राणप्रतिष्ठापना होत असल्याचे समजल्यावर उरण तालुक्यासह नवघर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. तीन दिवस चाललेल्या भक्तीमय कार्यक्रमाला भाविकांची अल्लोट गर्दी केली होती.



## रणरणत्या उन्हात वणव्यांचे वाढते प्रमाण

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

रणरणत्या उन्हामध्ये वणवा लावण्यामध्ये प्रचंड वाढ होत आहे. रस्त्याच्या कडेला, माळरान आणी डोंगर भागांमध्ये वणवा मोठ्या प्रमाणात लावले जात आहेत. निसर्गातील असलेली वनसंपत्ती यामध्ये जळून खाक होत असल्याचे दुर्देवी चित्र सध्या तालुक्याच्या ठिकाणी पहायनस मिळत आहे. यातच एप्रिल महीन्यात जंगलातील रानमेवा तयार होत असतो. या रानमेव्यावरती आदिवासी बांधवांचे उपजिविकेचे साधन निर्माण होत असते. वणव्यांमुळे या व्यवसायाला खिळ बसत आहे. यामुळे सर्व काही संपुष्टात येत असल्याने पर्यावरण प्रेमी समवेत आदिवासींमध्ये नाराजीचा सुर निघत आहे.



### रानमेवा, वनसंपत्ती धोक्यात

त्याच बरोबर मुक्त विहार करणाऱ्या प्राणीमात्रांना संकटाला सामोरे जाण्याची वेळ निर्माण झाली आहे. वणवा लागल्याने जंगलातील गवत जळून खाक होत आहे. पेरणीपुर्व राब जाळण्यासाठी लागणारे गवत मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नैराश्यता दिसून येत आहे. तसेच, जनावरांवर उपासमारीची वेळ येत असल्याची खंत शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- **विहिरी** - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट कॉंक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील-अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- **'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार** त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.
- **कुकूचकू पोल्ट्री फार्म निजामपूर** माणगाव रायगड येथे पिल्ले च्या पीक अप गाडीवर ड्रायवर पाहिजे पगार सर्व साधारण रूपये २५,००० प्रती महिना मिळेल कुटूंबासहित राहण्याची सोय आहे. संपर्क : अनुष्का राऊत ७७९८८८३८६४
- **क्षितीज बंगला, विद्यानगर** (तांत्रिक विद्यालयामागे) 1BHK भाड्याने देणे आहे. (गाडी पार्किंग उपलब्ध) ९९६९८२८२३९/९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडात चैत्राची मनमोहक पालवी

## रस्त्याच्या दुतर्फा लक्षवेधी दृश्य

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यात वनसंपदेचा अमूल्य ठेवा आहे. वेगवेगळ्या ऋतूत येथील वृक्षराजींचे अनोखे रूप पहायला मिळत आहे. चैत्र महिना सुरू झाला की अनेक झाडांची पानगळ सुरू होते, तर काही झाडांना रंगीबेरंगी कोवळी पाने फुटत असतात. यामुळे जंगल, गाव, शहरे व रस्त्याच्या दुतर्फा हे दृश्य अनेकांचे लक्ष वेधून घेत असतात.

ऐन, सावर, साग, पांगारा आदी झाडांची पानगळ झाली आहे. तर, करंज, जांभूळ, उंबर, पिंपळ व पळस आदी झाडांना नवीन कोवळी पालवी फुटत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक झाडाची पालवी विविध लक्षवेधी आकार व गर्द पोपटी, लाल, हिरवा आदी आकर्षक रंगाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. सूर्याची किरणे या पानांवर पडल्यावर जणू काही पानांच्या रंगांची उधळण झाल्याप्रमाणे वाटते. पानगळ झालेल्या झाडांमधून कोवळ्या पालवीचे मनमोहक धुमारे फुटलेले एखादे झाड दृष्टिक्षेपात पडले की अनेकांचे लक्ष वेधते. कित्येकांचे मन प्रसन्न करते. वाढत्या उष्म्यात ही कोवळी पालवी डोळ्यांना गारवा देते. या झाडाखाली आलेल्यांना शितल सावली देते. अनेक पशु-पक्ष्यांचे आश्रयस्थान बनते. कित्येक निसर्गप्रेमी व वन अभ्यासक या झाडांचे निरीक्षण करताना दिसतात. अनेक हौशी बहरलेल्या झाडांचे छायाचित्र आवर्जून घेत असतात.



### परागीभवन

**पळस, सावर, बहावा, गुलमोहर, पांगारा आदी काही झाडांना पानगळती झाल्यावर फुले येतात. पानगळ झालेली अशी झाडे पक्षी, कीटक वा काही सस्तन प्राण्यांकडून परागीभवन करून घेतात. पाने नसल्याने झाडांची फुले सहज दिसतात. पक्षी, कीटक फुलांकडे आकर्षित झाल्याने फुलांचे परागीकरण होते.**

### लक्ष वेधक

**जिल्ह्यात विविध प्रकारच्या वनस्पती आढळतात. ऋतुमानानुसार त्यातील काहींची पानगळ होते. तर, काहींना नवीन पालवी फुटते. हे चक्र वैशिष्ट्यपूर्ण व निसर्ग नियमाने सुरू आहे. यावेळी नवीन पालवी फुटलेली झाडे हमखास लक्ष वेधून घेतात.**




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ-माथेरान हा घाटरस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सुरक्षित बनविण्याचे उद्दिष्ट ठेवल्यानंतर आता हा घाटरस्ता सुरक्षित बनला आहे. घाटरस्त्यावर संरक्षक कठडे, संरक्षक भिंती, दरडी कोसळणार अशा ठिकाणी लोखंडी जाळ्या अशी कामे झाल्याने वाहनचालकांसाठी हा रस्ता सुरक्षित बनला आहे. म ाथेरान या पर्यटन स्थळी येणारे पर्यटकांचा प्रवास सुखकर झाला असल्याने पर्यटकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

नेरळ - माथेरान मिनीट्रेन रेल्वेच्या संपामुळे बंद झाली होती. त्यावेळी माथेरानमधील लोकांचे येणे-जाणे बंद झाले होते. त्यावेळी माथेरानमधील ग्रामस्थांनी माथेरान दस्तुरी नाका येथून नेरळकडे जाणारा रस्ता बनविण्यासाठी ग्रामस्थनांनी श्रमदान केले. त्यांनतर माथेरान-नेरळ घाटरस्ता सुरु झाला. त्यानंतर १९८२ मध्ये माथेरान घाटरस्त्यावर वाहने सुरु झाली. त्यानंतर एकेरी आणि अरुंद अशा रस्त्यावर वाहतूक करणे मोठे जिकरीचे होते. त्यामुळे माथेरान घाटाबाहेरून येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांना अपघात होत होते. त्यानंतर तत्कालीन सरकार आल्यावर कोकण पॅकेजमधून माथेरान घाटरस्त्याचे रुंदीकरण करण्याचा पहिला प्रयत्न झाला. त्यावेळी खऱ्या अर्थाने नेरळ-माथेरान रस्ता अपघात मुक्त होण्यास सुरुवात झाली.

# आसलपाड्यात विजेची उपकरणे जळाली

## फार्म हाऊसला दिलेल्या लाइनमुळे आमचं नुकसान; ग्रामस्थांचा आरोप

**। नेरळ । वार्ताहर ।**

अगोदरच विजेचा लपंडाव कर्जत तालुक्यात सुरु आहे. अशात आसलपाडा येथे ग्रामस्थांची एका दिवसात विजेवरील उपकरणे जळाली आहेत. आसलपाडा गावापासून जंगलच्या भागात असलेल्या एका फार्महाऊसला नव्याने लाईन टाकण्यात आली. खासगी ठेकेदाराने हे काम केले, तर काम पूर्ण झाल्यावर लाईन सुरु करताना त्यात तांत्रिक बिघाड होऊन अनेकांचे नुकसान झाले असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. त्यामुळे आम्हाला नुकसानभरपाई द्यावी अन्यथा न्यायासाठी ग्रामस्थ रस्त्यावर उतरतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



> आम्हाला आसलपाडा येथे फार्मसाठी लाईट मिळावी असा अर्ज आला होता. तेव्हा त्यांचा सातबारा बघून आम्ही परवानगी दिली. यासाठी ग्रामपंचायत ना हरकत दाखला आदी गोष्टी आम्हाला गरजेच्या नाहीत. तर, लाईन टाकताना काही फॉल्ट झाला आहे का याबाबत संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याशी बोलून चौकशी करतो याबाबत मला अद्याप काही माहिती नाही.
>
> – प्रकाश देवके, उपअभियंता

आसलपाडा गावाच्या काही अंतरावर जंगल भागात एका मुंबईतील धनिकाने फार्महाऊस तयार केला आहे. यासाठी आसल ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेतली नाही, असे ग्रामपंचायतीकडून सांगण्यात आले. या फार्मसाठी लाईट मिळावी, अशी मागणी संबंधित फार्म मालकाकडून महावितरणकडे करण्यात आली होती. यासाठी काही पोळ उभे करावे लागणार होते. तेव्हा हे काम फार्म मालकाने खासगी ठेकेदाराकडून करून घेतले. मात्र, हे काम करताना ठेकेदाराकडून काहीतरी गफलत झाली, त्यामुळे लाईन सुरु झाल्यावर गावातील टीव्ही, फ्रिज, बोअररिंग पंप, मिक्सर अशी विद्युत उपकरणं जळाली आहेत, असा थेट आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तेव्हा संबंधित फार्म मालकाने आम्हाला या वस्तू भरून द्याव्या, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

> मी सरपंच असताना या फार्म हाऊससाठी कुठलीही परवानगी देण्यात आली नव्हती. तर आतादेखील कुठल्याही स्वरूपाची परवानगी देण्यात आलेली नाही. आता त्यांनी नवीन लाईन टाकताना त्याचा त्रास ग्रामस्थांना झाला आहे. गरीब ग्रामस्थांच्या अनेक वस्तू जळाल्या आहेत. याची नुकसानभरपाई मिळावी, अशी आमची मागणी आहे.
>
> – रमेश लदगे, माजी सरपंच, आसल ग्रामपंचायत

> फार्महाऊसचे लाईटचे काम सुरु असताना गावात सगळीकडे लाईटच्या वस्तू जळल्या. आमच्या घरातला फ्रीजसुद्धा जळाला आहे. फार्महाऊसवरील साहेबांना भेटून त्यांना याबाबत सांगितले. तर त्यांनी तुम्हाला काय करायचं ते करा म्हणत धमकी दिली. त्यामुळे आम्ही पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार करणार आहोत.
>
> – रविना राजेश शेंडे, ग्रामस्थ आसलपाडा

दरम्यान, याबाबत पोलीस ठाण्यातदेखील आम्ही रीतसर तक्रार देणार आहोत. पण, कुणीही मुंबईतील धनिकांनी गावात घर, फार्म बांधताना किमान ग्रामस्थांना विश्वासात घ्यावं, ग्रामस्थांना दादागिरी करू नये, असे ग्रामस्थांनी सांगितलं आहे. तेव्हा याबाबत ग्रामस्थ आक्रमक झाल्याने ग्रामस्थांना त्यांची नुकसान भरपाई मिळणार की हा वाद चिघळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# तीन हजारांहून अधिक शेतकऱ्यांची आत्महत्या

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

देशभरात लोकसभेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. राज्यातही सर्वत्र निवडणुकीची धामधूम आहे. प्रत्येक नेता, कार्यकर्ता आपल्या पक्षाचा प्रचार करत आहेत. असं, असताना मात्र बळीराजाकडे या राजकारण्याचं लक्षच नाही. मागच्या सहा महिन्यांत १ हजार ३७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. राज्यात दुष्काळ जाहीर झाल्यापासून म्हणजेच ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४ या काळात मृत्यूला कवटाळले आहे.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाकडील आकडेवारीनुसार, जानेवारी २०२३ ते मार्च २०२४ या १५ महिन्यांत तब्बल साडेतीन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. राज्यात दररोज सरासरी सात शेतकरी आत्महत्या करत आहेत, अशी स्थिती मागच्या काही वर्षांची आहे. अमरावती व छत्रपती संभाजीनगर येथे हे प्रमाण जास्त आहे. यंदा ऑक्टोबर महिन्यात दुष्काळ जाहीर झाल्यापासून १ हजार ३७० शेतकऱ्यांनी जगाचा निरोप घेतल्याचेही आकडेवारीतून स्पष्ट होते.

राज्यात अपुरा पाऊस पडल्याने उत्पादन घटले आहे, तर काही भागांत अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने हाती आलेले पीक नष्ट झाले आहे. राज्यातील हवामान चक्र बदलत असल्याने शेतकरी नापिकी, अवकाळीमुळे वाया गेलेले पीक, शेतमालाला न मिळणारा बाजारभाव, शेती करण्यासाठी घेतलेले कर्ज यामुळे नैराश्येत गेला आहे. पण याशिवायदेखील शेतकऱ्यांच्या मागे मुलांचे शिक्षण आणि इतर घरगुती कारणेदेखील नैराश्यात जाण्यासाठी आहेतच, त्याचमुळे शेतकरी कोणताही विचार न करता आत्महत्येचा मार्ग निवडून आपल्या जीवनाचा शेवट करत असल्याचा आरोप होत आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# ब्रेक वॉटर बंधाऱ्यामुळे मच्छिमारांची न्यायालयात धाव

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड जंजिरा पर्यटनात जंजिरा किल्ल्याच्या मागे पर्यटकांच्या सुविधेसाठी जेटी उभारण्याचे काम सुरू असून, समुद्रातील पाण्याचा प्रवाह प्रतिबंधित करण्यासाठी सुमारे २५० मीटरची संरक्षक भिंत बांधण्याचे काम महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडून करण्यात येत आहे. मात्र, यामुळे राजपुरी खाडीतील स्थानिक मच्छिमारांना मासळीच्या दुष्काळाला तोंड द्यावे लागेल, तसेच ब्रेक वॉटर बंधाऱ्यामुळे मासेमारी करताना त्रास सहन करावा लागणार आहे.



याप्रकरणी न्यायासाठी तसेच होणाऱ्या नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी राजपुरी येथील महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सोसायटीतर्फे मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या जेटीमुळे स्थानिक मच्छिमारांना रावस, जिताडा, पापलेट, कोलंबी, शेवंड आदी मासळीला मुकावे लागेल, तसेच संरक्षक बंदरामुळे बोटीचा मार्ग बदलणार असल्याने डिझेल खर्चातही वाढ होणार आहे. त्यातून दिघी पोर्टने बोये टाकल्याने आधीच स्थानिकांच्या रोजगारावर गदा आली असून, मच्छिमार अडचणीत आल्याचे याचिकेत नमूद केले आहे.

वांद्रे-वरळी सी लिंक बांधताना ज्याप्रमाणे तेथील मच्छिमारांना भरपाई देण्यात आली, त्याप्रमाणे राजापुरीतील मच्छिमारांना भरपाई मिळावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय व न्यायाधीश अरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठात याचिकेवर सुनावणी झाली असता, न्यायालयाने महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडे संबंधित याचिकेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे - कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| जनार्दन देहू पाटील व ऋषिकेश अरुण गायकवाड | ४८/१/क | ०-४१-५० | ६-३२ |
| जनार्दन देहू पाटील | ५१/१ | ०-५२-०० यापैकी ०-३०-०० एवढे क्षेत्र | ८-१९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ३०/०४/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**जाहीर नोटीस** दि. ३०/०४/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे दहिगाव ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| ३९ | १ड | ०-२०-०० | १-३२ |
| ३७ | २ | ०-११-४० | ०-१५ |
| ३७ | ३ | ०-४९-८० | ७-९० |
| ३८ | १ | ०-४७-५० | ६-१५ |
| ३८ | २ | ०-४१-०० | ५-३५ |
| ३९ | २ | ०-१३-०० | २-२० |
| ३९ | ४ | ०-३४-९० | ५-५५ |
| ३५ | ४ | ०-४७-५० | ५-१० |
| ३६ | २ | ०-३६-९० | १-०५ |
| ३७ | १ | ०-४३-०० | ३-६० |
| ३९ | ३ | ०-४२-०० | २-२० |
| ४० | २ | ०-२३-८० | ०-३५ |

च्या शेतजमीन मिळकती विदयमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपटटा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तीचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे बोर्ले, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ. मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री. श्रीकृष्णा रामकेवल गुप्ता | ८/९ | १८८-०० | १८-८० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ३०/०४/२०२४

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
उप प्रादेशिक कार्यालय रायगड-१
**पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना**

**मे. कॅमेलियन ॲरॉन केमिकल्स प्रा.लि.**, सर्व्हे क्रमांक १४३, १४४ आणि १४५ येथे, गाव- कैरे, ता. खालापूर, जि. रायगड यांच्या प्रस्तावित इमेजिंग रसायनांच्या निर्मिती – १३४ मे टन/महिना साठी प्रस्तावित विस्तार प्रकल्पाकरीता पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित करणेकामी प्रस्ताव म. प्र. नि. मंडळाकडे प्राप्त झालेला आहे. या संदर्भात सदर प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा–या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना उपस्थित राहता येईल.

सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**ठिकाण –** सॅम्युअल हॉल, दुसरा मजला, जूना मुंबई पूणे हायवे (एन एच ४), खोपोली, जि. रायगड–४१०२०३.
**दिनांक –** ३१/०५/२०२४
**वार –** शुक्रवार
**वेळ –** दु. ०३.०० वाजता

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात–

**प्रादेशिक कार्यालय / उप–प्रादेशिक कार्यालय रायगड–१,**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन,**
**६ वा मजला, सेक्टर–११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१०२०१.**
**ई–मेल : sroraigad1@mpcb.gov.in**

दर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अलिबाग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड अलिबाग.
४. प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय, कर्जत, जि.रायगड.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय, ता. खालापूर, जि.रायगड
६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. खालापूर, जि. रायगड
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ६ वा मजला, रायगड भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरु पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),मुंबई–२२.
९. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२.
१०. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, पश्चिम विभाग, तळ मजला, पूर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर–४४०००१.
११. ग्रामपंचायत कार्यालये : मौजे- कैरे, मौजे-रिज, मौजे-तळेगाव, मौजे-पोसरी, मौजे- कसप, मौजे- आपटा, मौजे- वडगाव व मौजे- चौक.

सही/–
(प्रशांत भोसले),
उप प्रादेशिक अधिकारी, रायगड–१

**जाहीर सुचना**

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची शेतजमिन मिळकत, सौ. विणा विकास पाटील, राहणार नागडोंगरी, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी ००-२०-०० (हे. आ.), शेतजमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी, ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| कावीर, ता. अलिबाग | ७९/१ | १-०५-८०<br>०-०४-१० पो.ख.<br>१-०९-९० एकूण | १०-३० |

सदर जमिन मिळकतीपैकी ०-२०-०० (हे.आर.) ही जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २९/०४/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस बँकेस, वित्तीय संस्थेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशील श्री. नितीन शांताराम म्हात्रे, श्री. विनोद शांताराम म्हात्रे व श्री. नितेश केशव म्हात्रे, रा. मोठेभाल, पो. वढाव, ता. पेण, जि. रायगड यांनी मिळकत क्र. गाव उंबर्डे, स. नं. ८३/५ सध्याचे स. नं. ८३/५अ आणि स. नं. ८३/५ व क्षेत्र १-८-९ पैकी ०-२९-० क्षेत्र हे सहा. दुय्यम निबंधक पेन येथे नोंदणीकृत खरेदीखत क्र. ४८९०/२००७ अन्वये श्री.बाळाराम कमळ माळी यांचे कडून खरेदी केलेली आहे.

तरी संबंधित मिळकत कामी आमचे अशील यांचा स. नं. ८३/५ सध्याचे स. नं. ८३/५अ आणि स. नं. ८३/५ब क्षेत्र १-८-९ पैकी ०-२९-० क्षेत्र यावर कायदेशीर अधिकार व ताबा असून, तसेच माझ्या अशीलाच्या मालकीची व ताब्यातील मिळकत हि अधोरेखित केलेली नसून माझ्या अशीलाच्या मालकीची व ताब्यातील मिळकत कोणीहि खरेदी विक्री, तारण, गहाण, बक्षिसपत्र तसेच इतर कोणत्याही पद्धतीने कोणत्याही त्रयस्त इसमाशी आमचे अशीलाच्या मालकीची व ताब्यातील मिळकत संबंधी कोणताही व्यवहार करू नये.

असे व्यवहार करू नये तसेच असे व्यवहार केल्यास सदर व्यवहार हा बेकायदेशीर असेल व आमचे अशील यांचेवर बंधनकारक नसेल.
म्हणून जर कोणीही सदर मिळकत कामी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केला तर त्यास सर्वस्वी व्यवहार करणारे जबाबदार राहतील व त्यास आमचे अशील यांची कोणतीही कसूर राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

दिनांक:- २९/०४/२०२४

सही/-
**अरुण जोशी (वकील)**
ऑफिस क्र. ६२, प्रभात सेंटर
सि बी डी बेलापूर, नवी मुंबई
४००६१४
मो. क्र. ९३७१४५२८३७

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी नाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.सुभाष लक्ष्मण राऊत रा. सोगांव, अलिबाग यांचकडुन त्यांच्या अविभक्त हिश्याचे संपूर्ण क्षेत्राची खरेदी घेण्याचे निश्चीत केले आहे. सदर मिळकतीमधील हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सोगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १५१ | ०-४१-० | १०.५० |

सदर मिळकती पैकी श्री. सुभाष लक्ष्मण राऊत यांचे हिश्याचे ०-२०-५० हे. आर. इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :-३०/०४/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री विनय महादेव मळेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले असून आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत साठेकरार झालेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चौल, ता. अलिबाग जि. रायगड येथील भूमापन क व उपविभाग २४२१, एकूण क्षेत्र ०-१०-५० हे. आर. आकार रु. पैसे ०-०५-४५.

तरी वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणत्याही इसमाचा संस्थेचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, तारण, भाडेपट्टा या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण होईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २९/०४/२०२४

**ॲड. अभिजीत बाळाराम पाटील**
रा. घर क. २१५, वालवडे,
पांडवादेवी देहेनरोड पो. शहाबाज,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. नं. ७३९१९९६०३०

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड, गट नं. २५, क्षेत्र २-४१-०० आर.चौ.मी आकार २१.४० रू. पै. ही बिनशेती मिळकत (तद्नंतर सदर जाहीर नोटीशीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. कैलास बाळाराम थळे व श्री. उमेश बाळाराम थळे, दोघेही रा. मु. झालखंड, पो. कामार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत आमच्या अशीलांनी खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २९/०४/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री समीर सफरअली विराणी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री ओंकार गोवर्धन मुंब्रेकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे. साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ८ | ० | ०-१९-८०<br>पो.ख. ०-०२-३०<br>एकुण ०-२२-३० | १ | ४१ |
| ९ | ८ | ०-९१-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकुण ०-९२-०० | ० | ८४ |
| ९ | १० | ०-६६-००<br>पो.ख.०-१६-००<br>एकुण०-८२-०० | ० | ७८ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस ) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: ३०/०४/२०२४

पत्ता: १०१, १०२ व १०३, बुरहान प्लाझा, दिलकप कॉलेज रोड, ममदापुर नेरळ, ता कर्जत, जि रायगड ४१०१०१.
मो. ९०११५५५८०१

सही /-
**ॲड.अल्ताफ लियाकत डोंगरे**
(वकिल उच्च न्यायालय)

निवडक

## मिचेलने रचला विक्रम

**चेन्नई :** आयपीएलमध्ये चेन्नई विरुद्ध हैदराबाद संघात रविवारी (दि.२८) पार पडला. या सामन्यात चेन्नईने ७८ धावांनी विजय मिळवला. दरम्यान, या सामन्यात डॅरिल मिचेलने एक मोठा विक्रम केला आहे. या सामन्यात चेन्नईने हैदराबादसमोर २१३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबाद संघ १८.५ षटकात १३४ धावांवर सर्वबाद झाला. दरम्यान, त्यांच्या १० पैकी ९ विकेट्स या झेलबादच्या स्वरुपात गेल्या. विशेष म्हणजे ९ झेलांपैकी ५ झेल एकट्या डॅरिल मिचेलने पकडल्या.

## बंगळुरूचा भीम पराक्रम

**अहमदाबाद :** नरेंद्र मोदी मैदानावर विल जॅक्स आणि विराट कोहली यांनी गुजरातच्या गोलंदाजांचा अक्षरशः पाला-पाचोळा केला. जॅक्सने तुफानी फलंदाजी करत शेवटच्या दोन षटकांत ५७ धावा ठोकल्या. या दोघांच्या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर बंगळूरूने गुजरातचा त्यांच्याच घरात ९ गडी राखून पराभव केला. बंगळूरूने आयपीएलच्या इतिहासात दुसरे सर्वात मोठे आव्हान यशस्वीरित्या गाठले. विशेष म्हणजे, बंगळूरूने तब्बल १४ वर्षांनंतर २०० हून अधिक धावांचं लक्ष्य गाठले आहे.

## 'बिग हिटस' अपयशी

**चेन्नई :** आयपीएलच्या ४६व्या सामन्यात चेन्नई समोर हैदराबादचे आव्हान होते. चेन्नईच्या चेपॉक मैदानावर हा सामना खेळला गेला. चेन्नईते या सामन्यात हैदराबादचा ७८ धावांनी पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने २० षटकांत ३ गडी गमावून २१२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात, सनरायझर्स हैदराबाद १८.५ षटकांत १३४ धावांवर ऑलआऊट झाली. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचे आघाडीचे फलंदाज सलग दुसऱ्या सामन्यामध्ये अपयशी ठरले.

## भारत वेळेत पोहोचणार

**नवी दिल्ली :** आयपीएल संपल्यानंतर लगेचच टी-२० विश्वचषक खेळला जाणार आहे. आयपीएलचा अंतिम सामना २६ मे रोजी खेळला जाईल. त्यानंतर ५ दिवसांनी म्हणजेच १ जूनपासून टी-२० विश्वचषकाला सुरुवात होणार आहे. आता येथे प्रश्न उभा राहतो की, भारतीय खेळाडू फक्त पाच दिवसांच्या ब्रेक नंतर अमेरिकेत कसे जाणार? तर या संदर्भात एक रिपोर्ट समोर आला आहे. रिपोर्टनुसार, भारतीय खेळाडू आयपीएलच्या मध्येच वर्ल्डकपसाठी रवाना होणार आहेत.

## सॅमसनची जागा पक्की?

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकात भारतीय संघाच्या निवडीशी संबंधित मोठी बातमी समोर येत आहे. भारतीय संघात यष्टीरक्षक म्हणून सॅमसनची जागा पक्की झाली आहे. अशा स्थितीत पंत आणि राहुलपैकी एकाला बाहेर बसावे लागू शकते. सॅमसनने आयपीएलमध्ये जबरदस्त कामगिरी केली आहे. या हंगामात सर्वाधिक धावा करणारा तो दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ९ सामन्यात ३८५ धावा केल्या आहेत. तर, राहुलने ९ सामन्यात १४४-२७ च्या स्ट्राईक रेटने ३७८ धावा केल्या आहेत.

# आर.जे. चा 'रॉयल्स' विजय

### ■ झुंझार पोयनाड प्रीमियर लीग

**। पोयनाड । क्रीडा प्रतिनिधी ।**

**झुंझार युवक मंडळ पोयनाड या संस्थेच्या ६२ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या झुंझार पोयनाड प्रीमियर लिग क्रिकेट स्पर्धेत आर.जे. रॉयल्स संघाने अंतिम विजयी संघ होण्याचा मान मिळवला आहे. अंतिम सामन्यात जय मल्हार ११ संघाचा पराभव करत स्पर्धेत अव्वल स्थान प्राप्त केले. दि. २७ व २८ एप्रिल रोजी झुंझार युवक मंडळाच्या सुसज्ज मैदानावर ही स्पर्धा पार पडली.**



यावेळी स्पर्धेचे उद्घाटन जयंत नाईक, अन्वर बुराण, किशोर तावडे, दिपक साळवी, अजय टेमकर, भूषण चवरकर, अजित चवरकर, किशोर जैन, नंदकिशोर चवरकर, शैलेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले होते. संपूर्ण स्पर्धा हि झुंझार युवक मंडळाच्या सर्व आजी माजी खेळाडू, व्यापारी असोसिएशनचे सदस्य व पोयनाडच्या सर्व युवा खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आली होती.

प्रत्येक संघाला संघमालक व आयकॉन खेळाडू दिला होता व नंतर ऑक्शन करून सर्व सहभागी खेळाडूंना विविध संघात विभागून देण्यात आले होते. खेळाडूंनी परिधान केलेल्या विविध रंगांच्या गणवेशात खेळाडू झळकून दिसत होते. दोन दिवस उत्स्फूर्तपणे खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेऊन खेळाचा आनंद घेतला. संपूर्ण स्पर्धेत अष्टपैलू खेळ करणाऱ्या चैतन्य राऊतला मालिकावीर व अंतिम सामन्यासाठी सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. उत्कृष्ठ फलंदाज मृण्मय पालव, उत्कृष्ठ गोलंदाज राहुल जैन तर उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक म्हणून प्रणय साळवी यांची निवड करण्यात आली.

प्रथम क्रमांकासाठी रोख रक्कम १० हजार व भव्य आकर्षक चषक आर.जे रॉयल्स संघमालक राज जैन व कर्णधार चैतन्य राऊत यांना देण्यात आले. द्वितीय क्रमांकासाठी रोख रक्कम ६ हजार व चषक जयमल्हार संघाचे मालक विकास कामठे व कर्णधार प्रणय साळवी यांना देण्यात आले.

बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी अन्वर बुराण, सुनील पाटील, अनिता गंभीर, भूषण चवरकर, संध्या पाटील, किशोर तावडे, दिपक साळवी, नंदकिशोर चवरकर, सुजित साळवी, किशोर जैन, भरत जैन, जितेंद्र जैन, महेश अग्रवाल, प्रदिप जैन, अक्षय अग्रवाल, अमोल खैरनार, शैलेश पाटील, अ‍ॅड.पंकज पंडित, देवेंद्र गंभीर, संदीप जोशी, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्यासह पोयनाड व्यापारी असोसिएशनचे सर्व प्रमुख सदस्य, ग्रामस्थ व खेळाडु मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पात्रता फेरीत रौप्यपदकावर मोहोर

# महेश्वरीने मिळवला ऑलिंपिक कोटा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताची नेमबाज महेश्वरी चौहानने रविवारी संस्मरणीय कामगिरी केली. तिने महिलांच्या स्कीट प्रकारात रौप्यपदकाची कमाई करीत भारताला पॅरिस ऑलिंपिकसाठीचा कोटा मिळवून दिला. हा भारताचा २१ वा ऑलिंपिक कोटा ठरला. दोहा येथे पॅरिस ऑलिंपिकची पात्रता फेरी आयोजित करण्यात आली होती. महेश्वरी चौहानने रौप्यपदक जिंकत ऑलिंपिक कोटा मिळवल्यानंतर आनंदी भावना व्यक्त केली. ती म्हणाली, गेल्या काही वर्षांमध्ये प्रचंड मेहनत केली आहे. त्यामुळे साहजिकच आनंद होत आहे. शूट ऑफमध्ये थोडीशी बिथरली. मात्र, माझ्या कामगिरीनेसमाधानी आहे.



दरम्यान, भारताची महेश्वरी चौहान व चिलीची फ्रान्सिस्का चाडीड यांच्यामध्ये ६० शूटनंतर ५४-५४ अशी बरोबरी झाली होती.

# प्लेऑफची शर्यत झाली रोमांचक

### मुंबईवर टांगती तलवार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आयपीएलमध्ये प्लेऑफची शर्यत आता रोमांचक झाली आहे. सर्व संघ आपापले सामने जिंकून प्लेऑफच्या दिशेने पाऊल टाकत आहेत. परंतु, केवळ चारच संघ प्लेऑफमध्ये जाऊ शकतात. विशेष म्हणजे आतापर्यंत एकही संघ प्लेऑफसाठी पात्र ठरला नाही किंवा कोणताही संघ या शर्यतीतून बाहेर पडलेला नाही. अशा स्थितीत आगामी सामने आणखीनच रंजक होण्याची अपेक्षा आहे.

दरम्यान, चेन्नईने हैदराबादवर विजय मिळवल्यानंतर गुणतालीकेची समीकरणे पुन्हा एकदा बदलली आहेत. चेन्नईच्या विजयामुळे एकाच वेळी तीन संघांचे नुकसान झाले आहे.

त्याचवेळी, मुंबईवर टांगती तलवार आहे. मुंबईने फक्त ३ सामने जिंकले आहेत. यासोबत दोन संघांचे समान ६ गुण आहेत. ज्यामध्ये पंजाब आणि बंगळूरू त्यांचे ३ सामने जिंकून ६ गुण आहेत आणि सध्या ते आठव्या आणि दहाव्या स्थानावर आहेत. तर, मुंबई नवव्या क्रमांकावर आहे.



# पाकिस्तानची मोठी घोषणा

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ संदर्भात मोठी घोषणा केली आहे. पीसीबी प्रमुख मोहसिन नक्वी यांनी चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी तीन ठिकाणांची निवड केली आहे. पीसीबीने तिन ठिकाणांची यादी आयसीसीकडे पाठवली आहे. यात लाहोर, कराची आणि रावळपिंडी ही तीन ठिकाणे आहेत. वृत्तानुसार, भारताचे सामनेही येथे ठरले आहेत. आता पाकिस्तानच्या या घोषणेनंतर बीसीसीआयकडून काय प्रतिक्रिया येते हे पाहायचे आहे.



खरं तर यावेळी पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद भूषवत आहे. भारतीय संघ तिथे खेळायला जाणार का, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. आशिया कपचे यजमानपदही पाकिस्तानलाच दिले होते, पण त्यानंतर भारतीय संघाने तेथे खेळण्यास नकार दिला. त्यानंतर पाकिस्तानला भारताचे सामने श्रीलंकेत आयोजित करावे लागले होते.

### १४ वर्षांनंतर जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक

# भारताच्या तिरंदाजांनी रचला इतिहास

**। शांघाय । वृत्तसंस्था ।**

भारताच्या तिरंदाजांनी शांघाय येथे पार पडलेल्या विश्वकरंडकात इतिहास रचला. धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय व प्रवीण जाधव या भारतीयांनी ऑलिंपिक विजेत्या दक्षिण कोरियाच्या खेळाडूंना पराभूत करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली. भारताने रिकर्व्ह प्रकारात १४ वर्षांनंतर सुवर्णपदकावर मोहर उमटवली हे विशेष.

भारतीय तिरंदाजांनी तिरंदाजी विश्वकरंडकातही देदीप्यमान यश संपादन केले. पाच सुवर्ण, दोन रौप्य व एक ब्राँझ अशा एकूण आठ पदकांची माळ आपल्या गळ्यात घालताना भारतीय खेळाडूंनी बाजी मारली. अखेरच्या दिवशी पुरुषांनी रिकर्व्ह प्रकारातील सांघिक विभागात सुवर्णपदक जिंकतानाच दीपिकाकुमारीने रिकर्व्ह प्रकारातील महिलांच्या वैयक्तिक प्रकारात रौप्यपदकाची कमाई केली.



#### सुवर्णपदकापासून दूर

**दीपिकाकुमारी ही भारताची अनुभवी नेमबाज आहे. तिच्याकडे सुवर्णपदक जिंकण्याची सुवर्णसंधी होती. दीपिकाकुमारीने उपांत्य फेरीच्या लढतीत नाम सुहयिओन हिच्यावर ६-० असा विजय संपादन केला. लिम हिने पहिला सेट २७-२६ असा, दुसरा सेट २९-२७ असा आणि तिसरा सेट २८-२७ असा जिंकला व पहिले स्थान मिळवले. दीपिकाकुमारीने रौप्यपदक जिंकले.**

# धोनीच्या नावे मोठा विक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या ४६व्या सामन्यात चेन्नईने हैदराबादच्या रेकॉर्डब्रेक धावसंख्येचा दबदबा धुळीस मिळवला आहे. चेन्नईच्या चिदंबरम मैदानावर खेळल्या गेलेल्या या सामन्यात चेन्नईने हैदराबादवर तब्बल ७८ धावांनी मोठा विजय मिळवला. या विजयासह एमएस धोनीने आयपीएलमध्ये इतिहास रचला. त्याने अशी कामगिरी आपल्या नावे केली आहे, जी आजवर कोणालाही जमली नाही.



धोनीने आयपीएलमध्ये आतापर्यंत २५९ सामने खेळले आहेत. या लीगमध्ये सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडूचा विक्रम धोनीच्या नावे आहे. यापैकी १५० विजयी झालेल्या सामन्यांमध्ये धोनी संघाचा भाग होता. म्हणजेच तो आयपीएलच्या इतिहासात १५० सामने जिंकणारा पहिला खेळाडू ठरला आहे. आयपीएलमध्ये सर्वाधिक सामने जिंकण्याच्या बाबतीत आतापर्यंत कोणताही खेळाडू धोनीपर्यंत पोहोचू शकलेला नाही.

# पनवेलमध्ये खो-खोचे मोफत प्रशिक्षण

### शिबिराला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद

**। पनवेल । वार्ताहर ।**

उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा या प्रामाणिक भावनेतून तालुका क्रीडा अधिकारी मनीषा मानकर यांनी खो-खो प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर हे पूर्णपणे विनमुल्य आहे. मनीषा मानकर यांच्या माध्यमातून इतर वेळेस देखील सायंकाळच्या सत्रांमध्ये शाळकरी मुलांकरता खो-खोचे विनामूल्य प्रशिक्षण शिबिर चालविले जाते. ५ मे पर्यंत चालणाऱ्या या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे.



तालुका क्रीडा केंद्राच्या क्रीडांगणावर दोन खो-खोचे कोर्ट उभारण्यात आले असून येथे अत्यंत तंत्रशुद्ध पद्धतीने मुलांना खो-खोचे प्रशिक्षण दिले जाते. सीनियर केजी पासून ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी या प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. सध्या या ठिकाणी ५० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. यातील पाच खेळाडू जरी जिल्हा पातळीपर्यंत पोहोचले तरी आमच्या प्रयत्नांना यश आल्याचे आम्ही समजू, अशी प्रतिक्रिया मनीषा मानकर यांनी दिली. त्यापुढे म्हणाल्या की, १५ दिवस हे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर चालणार आहे. सुट्ट्यांचा सदुपयोग, खेळाशी ओळख आणि फिटनेस अशी तिहेरी उद्दिष्टे या शिबिराच्या माध्यमातून साध्य करण्याचा आमचा मानस आहे. या शिबिरातील सगळ्यात लहान असणारी स्वरा धार्मिक या मुलीची आई स्वाती धार्मिक यांनी कृषीवल प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, या शिबिराचा स्वराला खूप चांगला फायदा होत आहे. तिची एनर्जी लेव्हल वाढत आहे. तिला या खेळाची गोडी निर्माण झाली आहे. ती या खेळात इतकी रममाण झाली आहे की कधीही खाडा होऊ देत नाही.




### राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा

# मुरुडच्या शिरपेचात मानाचा तुरा

**। कोर्लई । वार्ताहर ।**

खारघर येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्यानिमित्ताने रायगड जिल्हा सदस्य आणि ऐन.पी.ओ. जे.के.के इंडिया फेडरेशनच्या मान्यतेने शिहन-अनिल महादे, सेंसाय-ओमकार बोरचडे यांनी आयोजित केलेली खेल महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा नुकतीच पार पडली.

या स्पर्धेसाठी रायगड, मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे, पालघर आदी जिल्ह्यांतून १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातून विद्यार्थ्यांनी ३ सुवर्ण पदके, १ रौप्य पदक व ५ कांस्य पदके अशी एकूण १० पदके पटकावत दमदार कामगिरी केली. त्याचप्रमाणे आपल्या नावे संघ चषक रायगड संघाने आपल्या नावे केली. या स्पर्धमध्ये स्वरा निशांत विरकुड- २ सुवर्ण पदक, सिया शैलेंद्र सिंह- सुवर्ण व कांस्य पदक, स्वयम सचिन अपराध- रौप्य व कांस्य पदक, पारस विद्याधर घुरुप- २ कांस्य पदक, आर्णा अमित पाटील- कांस्य पदक मिळवून उत्तम कामगिरी केली.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक शिहान- डॉ. आदित्य अनिल, सेंसाय- सनी रा. खेडेकर, शिवम धि. सिंह, शिवम अ. चव्हाण इत्यादी शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना प्रगती घुरुप, निशांत विरकुड, अमृता पाटील, जैनेंद्र सिंह, पालक वर्ग तसेच शीतो रियु कमिटी महाराष्ट्रने त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भारताच्या महिला संघाची विजयाने सुरुवात

### ■ मायदेशात बांगलादेशने पत्करली शरणागती

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

**रेणूका सिंग, पूजा वस्त्रकार यांच्यासह सर्व गोलंदाजांनी केलेल्या प्रभावी कामगिरीच्या जोरावर भारताच्या महिला क्रिकेट संघाने येथे पार पडलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेश महिला संघावर ४४ धावांनी विजय मिळवला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. १८ धावांत तीन फलंदाज बाद करणारी रेणूका सिंग ही सामन्याची मानकरी ठरली.**



भारताकडून मिळालेल्या १४६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या बांगलादेशच्या संघाला २० षटकांत आठ बाद १०१ धावांपर्यंत मजल मारता आली. कर्णधार निगार सुल्तानाने ४८ चेंडूंमध्ये पाच चौकार व एक षटकाराच्या साहाय्याने ५१ धावांची खेळी साकारली; पण इतर फलंदाजांच्या अपयशामुळे बांगलादेशला विजयापासून दूरच राहावे लागले. रेणूका सिंगने १८ धावांमध्ये दिलारा अख्तेर, शोभना मोस्तरी व राबेया खान यांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. पूजा वस्त्रकारने २५ धावा देत दोन फलंदाज बाद केले. तसेच श्रेयांका पाटील, दीप्ती शर्मा व राधा यादव यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

दरम्यान, याआधी भारतीय महिला क्रिकेट संघाने नाणफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय महिला फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही; पण प्रत्येकाने छोट्या महत्त्वाच्या खेळी केल्या. स्मृती मानधनाला नऊच धावा करता आल्या. त्यानंतर शेफाली वर्माने ३१ धावांची, यास्तिका भाटीयाने ३६ धावांची, कर्णधार हरमनप्रीत कौरने ३० धावांची आणि रिचा घोषने २३ धावांची खेळी केली. भारतीय संघाने २० षटकांत सात बाद १४५ धावा फटकावल्या. बांगलादेशकडून राबेया खानने २३ धावा देत तीन फलंदाज बाद केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)